किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

## आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा 'अर्थ'बोध करून देणारे मासिक

INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY
LIBRARY
८५१८

३ ● संगोपन

५ ● व्यथा... घडी मोडलेल्या कुटुंबांची !

रक्षण पर्यावरणाचे

१३ ■ ध्येय एक, मार्ग अनेक

२१ ■ कूच-आगेकूच चळवळीची

२९ ■ विचार आणि व्यवहार

३५ ● जिकडेतिकडे (आम्लयुक्त समुद्रांकडे ?)

खंड ७ : अंक २ मे २००८

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**वार्षिक वर्गणी १००/- रुपये**
**(परदेशस्थ वाचकांसाठी $२०)**
वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका' दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.**

**वर्गणीसाठी पत्ता :**
**व्यवस्थापक, अर्थबोधपत्रिका,**
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०
फॅक्स : २५६५७६९७
ई-मेल: ispe@vsnl.net, ispe@vsnl.com

---

**अर्थबोधपत्रिका**
**खंड ७ (अंक २) मे २००८**
**संपादक - अभय टिळक**
**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**

### *'अर्थबोधपत्रिके'तील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- नि:पक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक
- हाताशी असणाऱ्या मोजक्याच वेळात जगाबद्दलचे भान वाढविणारी

### *'अर्थबोधपत्रिके'चा हेतू*

प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.

### *'अर्थबोधपत्रिका'कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता..मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

# संगोपन

आपले घर हे सर्वांनाच प्रिय असते. ऊन, पाऊस, थंडी यांपासून संरक्षण देणारे घर म्हणजे केवळ चार भिंती नव्हेत. घराच्या चार भितींना 'घर'पण लाभते ते कौटुंबिक नातेसंबंधांमुळे. नातेसंबंधांतील वीण घट्ट होते ती जिव्हाळा, प्रेम, संगोपन, त्याग अशा अनेक भावभावनांमुळे. घराचे 'घर'पण जपण्यासाठी घरातील प्रत्येक व्यक्ती धडपडते तेव्हा एक सुखी, समाधानी कुटुंब आकारला येते. अशा कुटुंबात बालगोपाळांचे संगोपन होते, त्यांच्या प्रगतीची स्वप्ने रंगतात आणि ती साकारतातही. पण सर्वांच्याच नशीबी असे सुख असते असे नाही. मध्यमवर्गीय कुटुंबांची सांपत्तिक स्थिती त्या मानाने खूपच चांगली असली तरी अल्प मिळकत असणाऱ्या कुटुंबांची स्थिती जगभरच काळजी वाटावी अशी आहे. त्यातही हातावर पोट असणाऱ्या कुटुंबांची स्थिती तर अधिकच नाजूक. अशा कुटुंबांमध्ये मुलांचे संगोपन हा प्रश्न मोठा जटिलच असतो. पोटासाठी काबाडकष्ट करणाऱ्या पालकांना आपल्या लहानग्यांकडे बघण्यासही वेळ मिळत नाही. निसर्गक्रमानुसार ही मुले केवळ 'वाढत' असतात, पण त्यांचे 'संगोपन' होते का ? जागतिकीकरणामुळे तर या पूर्वापार वास्तवास अधिकच नवीन आयाम जोडले गेले आहेत. कमालीच्या गळेकापू स्पर्धेत टिकण्यासाठी देशोदेशीच्या कंपन्या आपल्या उत्पादन खर्चात कपात घडवून आणण्याच्या दृष्टीने मनुष्यबळासह एकंदरच उत्पादकघटकांचा कमाल वापर पदरात पाडून घेण्याच्या मागे आहेत. यातून जगभरातील कामगार क्षेत्रात जे बदल होत आहेत त्यांतून एका सार्वत्रिक अनिश्चिततेचा उगम झालेला दिसतो. आहे तो रोजगार टिकवण्यासाठी आजमितीस जगभरचाच श्रमिक अगतिक होत असल्याचे चित्र ठायीठायी अनुभवास येत आहे. या सगळ्याचा अपरिहार्य परिणाम आमच्या कुटुंबसंस्थेची घडी आमूलाग्र बदलण्यात होतो आहे. विशेषतः, असंघटित क्षेत्रातील कुटुंबांच्याबाबतीत तर ही घडी पूर्णतः विसविशीतच होत आहे. यांत भरडले जात आहे ते चिमुकल्यांचे भावविश्व आणि भविष्यही. जी बाब मनुष्यबळाच्या पिळवणुकीची तीच बाब नैसर्गिक साधनसामग्रीच्या ओरबडण्याची. खरे तर ही बहुरत्ना वसुंधरा म्हणजे

मनुष्यप्राण्याचे एक मोठे कुटुंबच. या मोठ्या कुटुंबाची स्थितीही चिंताजनकच आहे. जगभरातच पर्यावरणाची हानी इतक्या मोठ्या प्रमाणावर होत आहे की भविष्यात या वसुंधरेचा विनाश होण्याची भीती दाटू लागली आहे. या आपल्या विश्वकुटुंबाची परवड रोखली नाही तर मनुष्याचे भविष्य अंधकारमय असेल असे संकेत पर्यावरणविषयक अनेक अभ्यास देत आहेत. या संकेतांना योग्य प्रतिसाद देऊन पर्यावरणाच्या संगोपनासाठी सर्वांनीच कंबर कसणे गरजेचे आहे. अलीकडेच होऊन गेलेला 'वसुंधरा दिन', १५ मे रोजी साजरा होणारा 'आंतरराष्ट्रीय कुटुंब दिवस' आणि ५ जून रोजी येणारा 'जागतिक पर्यावरण दिन' असे तिहेरी औचित्य साधून संबंधित विषयांचा ऊहापोह 'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकात केला आहे. ✿✿

## वाचकांचा प्रतिसाद

**आ**पला 'ग्राहक दिन विशेष' अंक (मार्च २००८) नेहमीपेक्षा वेगळी माहिती देणारा आहे. या अंकात चैनीच्या वस्तूंच्या बाजारपेठेबाबत काही लेख आहेत. अशा वस्तू भारतीय बाजारपेठेत उपलब्ध झाल्या तरी किती नागरिक त्या विकत घेतील याची शंका वाटते. तसेच, आजच्या काळात विविध माध्यमांद्वारे ग्राहकांवर जाहिरातींचा अक्षरशः भडिमार होत आहे. त्यामुळे, जाहिरातींच्या इष्टानिष्ट परिणामांबाबत एखादा लेख या अंकात हवा होता असे वाटते.

**मोहन मार्डीकर, नागपूर**

**आ**मच्या घरात 'अर्थबोधपत्रिके'चे वाचन आमच्या वडिलांमुळे सुरू झाले. 'पत्रिके'चे अंक अभ्यासपूर्ण, रंजक आणि वाचनीय असतात.

**डॉ. के. डी. देशमुख, औरंगाबाद**

### निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा साइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

# व्यथा... घडी मोडलेल्या कुटुंबांची !

हॉन्डूराज्मधील हे चित्र. 'नाईके' या बहुराष्ट्रीय कंपनीत कामगार असलेल्या गॅब्रिएला सावेद्राची ही कहाणी. एक लहानशी खोली - खरे तर खोपटे - हे तिचे घर. ती आणि तिची दीड वर्षाची मुलगी हा तिचा संसार. दुसरा शब्द नाही म्हणून संसार म्हणायचे. नाहीतर रोजीरोटीसाठी दिवसरात्र कंपनीतच असणाऱ्या गॅब्रिएलाला लेकीला डॉक्टरकडेही न्यायला वेळ नाही. नवऱ्याच्या मृत्यूनंतर लेकीकडे बघायचे की पोटापाण्याची सोय करायची असा विचार करायलाही तिला सवड नाही. पहाटे लवकर उठायचे, स्वतःचे व जमल्यास मुलीचे आवरायचे. कसे तरी, काही तरी ओले-सुके पोटात ढकलून कंपनीत वेळेवर पोहचायचे, मान वर न करता तेथे काम करायचे, जेवायची सुटी झाली तरी जेवायला मिळेल याची खात्री नाही. कारण, सुटीचा अवधी थोडा आणि जेवण्यासाठी बाहेर पडण्यासाठी कामगारांची ही मोठी रांग. जेवण्याच्या जागी पोहचून एखाद-दोन घास खात नाही तोच परतीची घंटा. पुन्हा एकदा रांग. उशीर झाला की बोलणी बसणार, आहे ती नोकरी जायची भीती. पुन्हा वेळेवर घरी परतणे जमतेच असे नाही. कंपनीत कधीही जास्तीचे काम म्हणून थांबणे आवश्यक. त्याचा मोबदलाही कमी. कधीकधी तर पहाटे तीनपर्यंतसुद्धा काम करायचे. घरी परतायचे ते जणू लगोलग पुन्हा कामावर हजर होण्यासाठीच ! प्रचंड थकवा, ताण आला तरी काम ओढायचे. या चक्रातून सुटका नाही. लेकीची जबाबदारी सासूवर. सासूने ती नाराजीनेच स्वीकारलेली. मुलगी आजारी असली तरी गॅब्रिएलाला रजा नाही.... ही अतिशयोक्ती नाही. 'चोवीस तास सात दिवस' हा नव्या जगाचा नियमच नाही का ? त्यातच जागतिकीकरणाच्या या युगात ज्या देशांमध्ये स्वस्त श्रम उपलब्ध होतील त्या देशांमध्ये कंपनी आपले उत्पादन हलवणार. त्यामुळे नोकरी गमावण्याची टांगती तलवार असणे स्वाभाविक ! हे आहे आजच्या शहरांतील गरीब कुटुंबांचे वास्तव. देश वा शहर बदलले तर तपशीलाचा काय तो फरक पडेल, इतकेच !

औद्योगीकरणानंतर व जागतिकीकरणानंतर बदललेल्या समाजव्यवस्थेत म्हणजे विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात व चालू शतकाच्या सुरुवातीच्या काळात विविध देशांमधील कुटुंबांसमोर नवीन आव्हाने उभी ठाकली आहेत. देशकालपरिस्थितीनुसार

या आव्हानांचे स्वरूप काही प्रमाणात वेगवेगळे असले तरी कुटुंबव्यवस्थेच्या दृष्टीने ते जितके चिंतनीय तितकेच चिंत्य असे आहे. पूर्वीच्या तुलनेत मजुरी/वेतन यांत आज वाढ झालेली असली तरी दैनंदिन जीवनांतील विविध प्रकारचे खर्चही वाढत आहेत, जीवनावश्यक वस्तू महागाईच्या विळख्यात अडकल्या आहेत. आरोग्य सुविधा अधिक प्रमाणात उपलब्ध होत असल्या तरी विविध कारणांमुळे अनारोग्य वाढते आहे. शिक्षण सर्वदूर पोहचावे असे म्हटले जात असले तरी शाळाबाह्य मुलांची संख्याही भरपूर आहे. काही देशांमध्ये नवमध्यमवर्ग उदयास आला वा येऊ लागला आहे असे चित्र दिसत असले तरी त्या देशांमध्ये जागतिकीकरणाचे फायदे विविध समाजगटांपर्यंत पोहचले नाहीत, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. वाढत्या नागरीकरणाद्वारे शहरी कुटुंबांच्या संख्येत भर पडली आहे. शहरांचा विकास वेगाने होतो आहे, त्यामुळे ग्रामीण भागांतून शहरांत स्थलांतरित होणाऱ्यांची संख्याही वाढली आहे. आधीच शहरी असलेल्या वा नव्याने शहरी बनलेल्या अशा दोन्ही प्रकारच्या शहरी कुटुंबांमध्ये स्थित्यंतरे होत आहेत. कुटुंबांचा विकास, समाजाचा विकास आणि देशाचा विकास या सर्व बाबी परस्परांशी जोडल्या गेल्या आहेत. हे लक्षात घेऊन संयुक्त राष्ट्रसंघातर्फे १५ मे हा दिवस 'आंतरराष्ट्रीय कुटुंब दिवस' मानला गेला आहे. त्यातही या वर्षीची मध्यवर्ती संकल्पना 'फादर्स अँड फॅमिलीज् : रिस्पॉन्सिबिलिटीज् अँड चॅलेंजेस्' ही आहे. बदलत्या कुटुंबसंस्थेचा हा 'कौटुंबिक' ऊहापोह आंतरराष्ट्रीय कुटुंबदिनाच्या निमित्ताने करणे म्हणूनच संयुक्तिक ठरते.

देशोदेशींच्या कुटुंबांच्या स्थितीचा - विशेषतः गरीब कुटुंबांचा - एक आंतरराष्ट्रीय अभ्यास अमेरिकास्थित बालरोगतज्ज्ञ Jody Heymann यांनी केला आहे. 'इन्स्टिट्यूट फॉर हेल्थ अँड सोशल पॉलिसी'च्या त्या संस्थापक-संचालक आहेत. हार्वर्ड विद्यापीठात त्या अध्यापनाचे काम करतात. अमेरिकेच्या सिनेटमध्ये अलीकडेच 'द हेल्दी फॅमिलीज् ॲक्ट'ची चर्चा झाली, तेव्हा त्यांनी सिनेटमधील संबंधित समितीसमोर या विषयावर आपले विचारही व्यक्त केले. देशोदेशींच्या कुटुंबांच्या स्थितीच्या अभ्यासासाठी त्यांनी चालू शतकाच्या सुरुवातीस पाच खंडांतील सात देशांमधील ५५हजार कुटुंबांचे सर्वेक्षण केले. प्रामुख्याने बालकांच्या आरोग्यावर भर देणारा हा अभ्यास Forgotten Families या शीर्षकाच्या पुस्तकाद्वारे २००६मध्ये प्रसिद्ध झाला आहे. हॉन्डूराज्‌मधील चित्र या अभ्यासातून पुढे आले. तपशीलाचा भाग वगळता इतर देशांतही अशाच प्रकारचे चित्र असल्याचे या अभ्यासात आढळले.

औद्योगीकरणाआधी विविध देशांमधील समाजजीवन शेतीवर व छोट्या ग्रामोद्योगांवर अवलंबून होते. कुटुंबाच्या गरजा व वेळा सांभाळून ही कामे करणे शक्य होते. एकत्र कुटुंबे, मोठी कुटुंबे यांमुळे लहानग्यांची व ज्येष्ठांची काळजी कोण घेणार, हा प्रश्न नव्हता. उदरभरणासाठी सर्व व्याप आवश्यक होते तरी घड्याळाच्या काट्यांवर नाचणाऱ्या कंपनी-कामकाजाच्या वेळा सांभाळायच्या असे बंधन नव्हते. पण औद्योगीकरणानंतर समाजव्यवस्था, अर्थव्यवस्था यांत बदल घडून आले व कामाच्या वेळा पाळण्याचे बंधन कामगार/कर्मचारी यांच्यावर आले. औद्योगीकरणाबरोबरच शहरीकरणाच्या प्रक्रियेने वेग घेतला. शहरांमध्ये अनेक प्रकारचे शिक्षण देणाऱ्या संस्था उभ्या राहिल्या. नवनवीन उद्योगांमुळे नोकऱ्यांच्या संधीही मोठ्या प्रमाणात उपलब्ध होऊ लागल्या. ग्रामीण भागांतील कुटुंबांमधील अनेक जण शिक्षण वा नोकरीच्या निमित्ताने शहरांमध्ये येऊ लागले. शहरी जीवन अंगवळणी पडून तेथेच स्थायिक होऊ लागले. त्यामुळे पूर्वीच्या कुटुंबव्यवस्थेत बदल झाले. कुटुंबातील ज्येष्ठ सदस्य गावाकडे व तरुण पिढी शहरांत असे चित्र घरोघरी आढळू लागले. दरम्यान, शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर मध्यमवर्ग वाढू लागला त्याप्रमाणेच छोट्या-मोठ्या नोकऱ्या शोधत कनिष्ठ वर्ग व रोजंदारीवर काम करणारा गावांमधील भूमिहीन असा गरीब वर्गही शहरांमध्ये एकवटू लागला. शहरी कुटुंबांची संख्या वाढली. त्यामुळे पूर्वी शेती व ग्रामोद्योगांवर आधारित असलेल्या समाजव्यवस्थेमधील कुटुंबपद्धतीचा ढाचा बदलला, रूप पालटले. शहरांमध्ये छोटी कुटुंबे दिसू लागली. बदलत्या समाजव्यवस्थेत हळूहळू सर्वच देशांतील स्त्रियांचा नोकऱ्यांमधील सहभाग वाढू लागला. कौटुंबिक जबाबदारी नसलेल्या स्त्रियांचे नोकरी करण्याचे प्रमाण सुरुवातीच्या काळात अधिक होते. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सर्व स्तरांतील स्त्रियांचे अर्थार्जन करण्याचे प्रमाण एकंदर वाढले. १९६० ते २००० या काळात विविध देशांमधील नोकरदार स्त्रियांचे प्रमाण - मध्य अमेरिका - १३ टक्क्यांवरून ३३ टक्के, पश्चिम युरोप - ३२ टक्क्यांवरून ४१ टक्के, दक्षिण अमेरिका - २१ टक्क्यांवरून ३५ टक्के, मध्य आशिया १७ टक्क्यांवरून २५ टक्के, उत्तर आफ्रिका २३ टक्क्यांवरून ३१ टक्के अशा प्रकारे वाढले. याच काळात पुरुषांचे नोकऱ्या करण्याचे प्रमाण घटले नाही. ज्या पालकांची मुले सहा वर्षांपेक्षा कमी वयाची होती त्यांचेदेखील नोकरीतील प्रमाण या काळात लक्षणीय होते, हे उल्लेखनीय.

चालू शतकांत शहरांमधील परिस्थिती आणखी बदलली. दळणवळणाच्या सोयी उपलब्ध झाल्या. विज्ञान-तंत्रज्ञान प्रगत होत गेले. उदारीकरण, खाजगीकरण व

जागतिकीकरण यांमुळे अनेकानेक प्रकारच्या संधी पुन्हा शहरांमध्येच निर्माण झाल्या. त्यामुळे विकसित शहरांचाच अधिक वेगाने विकास होऊन त्यांच्या प्रश्नांचा आलेखही चढताच राहिला. छोटी गावे व छोटी शहरे यांचा विकास तर झाला नाहीच, उलट विकासाचा असमतोल अधिकच वाढला. परिणामी, गावांमधून अधिक प्रमाणात स्थलांतर घडून आले व त्यामुळे शहरी कुटुंबांची संख्या अधिकच वाढली. तसेच कुटुंबाच्या अर्थव्यवस्थेचा डोलारा सांभाळण्यासाठी विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महत्त्वाचे बनलेले स्त्रियांचे अर्थार्जन आता अधिकच महत्त्वाचे ठरू लागले. स्पर्धेच्या युगात टिकण्याची सर्वांचीच एक धडपड चालू झाली. कौटुंबिक ताणतणाव वाढले. अनेक देशांमध्ये थोड्याफार फरकाने असेच काहीसे घडले.

## मुलांच्या संगोपनाचा प्रश्न गंभीर

या वाढत्या शहरी कुटुंबांचा सर्वांत मोठा प्रश्न आढळतो तो मुलांच्या संगोपनाचा. अनेक देशांत हा प्रश्न बहुतांश कुटुंबांनी वैयक्तिक पातळीवर आजी-आजोबांच्या मदतीने सोडविण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते. काहींनी पाळणाघरांची मदत घेतल्याचे आढळते. शहरांमधील ज्या कुटुंबांची आर्थिक स्थिती चांगली वा बरी आहे त्यांचे मुलांच्या संगोपनाकडे दुर्लक्ष झाले नसले तरी हा प्रश्न त्यांना पडला होताच असे दिसते. तर, आर्थिकदृष्ट्या मागास घटकांचे मात्र गरिबीमुळे व पर्याय उपलब्ध नसल्याने मुलांच्या संगोपनाकडे दुर्लक्ष होते. अर्थात हे पालक अशिक्षित व अत्यल्पशिक्षित असले तरी मुलांना वेळ द्यावा असे त्यांना वाटते व मुलांची काळजी त्यांना असतेच, पण परिस्थितीमुळे त्या दिशेने पावले उचलणे त्यांना शक्य होत नाही. सुरुवातीला वर्णन केलेले हॉन्डूराज्मधील गॅब्रिएलाचे उदाहरण याबाबतीत प्रातिनिधिक ठरते.

मुलांचे आरोग्य आणि शिक्षण यादृष्टीने बालपणाचा काळ अतिशय महत्त्वाचा असतो. मुलांच्या भवितव्यासाठी त्याच काळात पालकांसाठी अर्थार्जन अत्यावश्यक ठरते. अशा परिस्थितीत आजी-आजोबांची मदत घेऊनच त्यांना पुढे जाता येते. पण आजी-आजोबांच्या मदतीने मुलांचे संगोपन करतानाही अनेक अडचणी येतात. शहरांमधील मध्यमवर्गीयांची घरे लहान असल्याने सर्वांना एकत्र राहता येतेच असे नाही. अशा कुटुंबांना मोठे घर घेणे वा दुसरे घर घेणे शक्य होतेच असेही नाही. मर्यादित उत्पन्न असणाऱ्यांचे घर तर एक वा दोन छोट्या खोल्यांचे असते. त्यापेक्षाही निम्न स्तरावरील नागरिकांना तर एखाद्या खोपट्यातच राहण्याची वेळ येते. अशा वेळी घराची आर्थिक गरज लक्षात घेता अनेक कुटुंबांमध्ये आजी-आजोबादेखील अर्धवेळ

वा पूर्णवेळ काम करणारे असू शकतात/असतात. आजोबा असे काम करणारे असतात तेव्हा तरुण पिढी घरात नसल्याने नातवंडांच्या संगोपनाबरोबरच घर सांभाळण्याची जबाबदारीदेखील आजीवर पडते. या शिवाय अनेकदा आजी-आजोबा आपले मूळ गाव सोडून शहरांत येतातच असे नाही. शहरांत न येण्यामागे लहान घरे हे एक मोठे कारण असते. शिवाय शहरांत ज्या तरुण पिढीची व ज्येष्ठांची वेगवेगळी घरे असतात ती जवळ असली तर ठीक, नाहीतर तरुण पिढीला रोजच्यारोज मुलांची ने-आण करणे शक्य होते असे नाही. अशा वेळी केवळ चार पैसे हाताशी असले तर त्यांना मुलांना पाळणाघरांत ठेवता येते. त्यातही घराजवळच चांगली पाळणाघरे मिळणे ही महत्त्वाची बाब ठरते. नाही तर कुटुंबातील स्त्रीने मुलांसाठी अर्थार्जनावर पाणी सोडणे गरजेचे बनते. त्यामुळेदेखील कुटुंबे आर्थिक अडचणीत येतात हे वेगळेच. शहरांमध्ये एकत्र कुटुंबपद्धती मागे पडून विभक्त कुटुंबांची संख्या वाढत असल्याने या प्रश्नाचे गांभीर्य अधिकच वाढते.

शहरांत वास्तव्यास असलेल्या गरीब कुटुंबांची परिस्थिती बिकटच असते. एखाद्या छोट्याशा खोलीत त्यांचा संसार थाटलेला असतो. कुटुंबाच्या गरजेप्रमाणे गावाकडून आलेली किमान चारपाच मोठी माणसे व तीन-चार लहान मुले त्या छोट्याशा खोलीत राहात असतात. गरिबीमुळे सर्वच मोठ्यांना कामाला बाहेर पडावे लागते. लहान मुलांच्या संगोपनासाठी जास्त वेळ देणे त्यांना शक्य होते असे नाही. त्यामुळे कित्येकदा ही लहान मुले एकटी वा त्यातल्यात्यात मोठ्या भावंडांच्या म्हणजे आठ-नऊ वर्षांच्या दादा-ताईच्या भरवशावर घरात खेळत असतात, घरानजीक हुंदडत असतात. अशा परिस्थितीत अपघाताच्या शक्यता वाढतात. कधी कधी शेजाऱ्यांच्या सहकार्याने तर कधी नातेवाईकांच्या मदतीने मुले वाढतात, पण त्यांच्याही वेळांच्या मर्यादा असतात. अशा परिस्थितीत मुलांचे आरोग्य व शिक्षण या दोन अतिशय महत्त्वाच्या बाबी दुर्लक्षिल्या जातात. त्यामुळे भविष्यकाळासाठी निरोगी व सुशिक्षित अशी पिढी घडत नाही. त्यामुळे मुलांचे तर नुकसान होतेच, शिवाय कुटुंबांचे व पर्यायाने देशाचेही नुकसान होते. बहुतांश देशांमध्ये अशी परिस्थिती आढळते. पाच - सहा वर्षे वयाची लहान मुले घरी असताना घरातील १८ वर्षांवरील सर्वांनी पैशासाठी कामावर जाणाऱ्या कुटुंबाची संख्या मेक्सिकोमध्ये ३० टक्के, बोट्स्वाना येथे २९ टक्के, ब्राझीलमध्ये ४१ टक्के, रशियात ५० टक्के तर व्हिएतनाम येथे ६८ टक्के इतकी आहे (ही टक्केवारी सर्वेक्षण केलेल्या एकूण ५५ हजार कुटुंबांपैकी असावी).

दर दिवशी दोन डॉलर (विद्यमान भारतीय विनिमय दरानुसार साधारणपणे ८० ते ८२ रुपये) इतके उत्पन्न असणाऱ्या नागरिकांची संख्या संपूर्ण जगात सुमारे २.७ अब्ज तर दर दिवशी फक्त एक डॉलर (साधारणपणे ४० ते ४१ रुपये) इतके कमी उत्पन्न असणाऱ्या नागरिकांची संख्या सुमारे १.१ अब्ज इतकी आहे. यावरून कोट्यवधी मुलांचे बालपण कसे असेल याची कल्पना करणेही क्लेशदायक आहे. काम करून पैसा मिळवू शकणाऱ्या स्त्री-पुरुषांचे व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्यांचे (म्हणजे लहान मुले व ज्येष्ठ/वृद्ध) प्रमाण (Dependency Ratio), विकसित देशांच्या तुलनेत, विकसनशील देशांमध्ये ५० टक्के ते १०० टक्के इतके अधिक आहे. सर्वेक्षणात सहभागी झालेल्या बहुतांश पालकांनी मुलांची काळजी कोण घेणार, हाच आपल्यापुढील मोठा व महत्त्वाचा प्रश्न असल्याचे सांगितले. ज्या पालकांनी मुलांना सांभाळण्यासाठी अनौपचारिक वा औपचारिक मदतीचा मार्ग स्वीकारला होता त्यांनादेखील हाच प्रश्न होता, कारण एका अर्थाने विनामोबदला अनौपचारिक मदत देणाऱ्या व्यक्तीचे ते उपकार असतात. काही अघटित घडल्यास त्याची जबाबदारी त्यांच्यावर टाकणे हे योग्य ठरत नाही. ज्या वेळी बेताचा आर्थिक मोबदला देऊन मुलांची जबाबदारी कुणावर तरी सोपविण्यात येते, तेव्हादेखील ती व्यक्ती पालकांच्या गैरहजेरीत मुलांची नीट काळजी घेईल याची खात्री देता येत नाही, असे बहुतांश पालकांना वाटते. काही प्रमाणात पाळणाघरांवर विश्वास टाकता येतो पण घराजवळ चांगली पाळणाघरे असतातच असे नाही, शिवाय त्याचा खर्च पालकांना परवडणारा नसतो. या शिवाय ज्या मुलांच्या बालपणाचा प्रवास अशा अनंत अडचणींतून होतो त्यांच्यात मोठेपणी वर्तणूकविषयक समस्या निर्माण होतात. वर्तणूक बिघडून मुले वाममार्गाला लागण्याची शक्यता बळावते. हेही समाजासाठी घातकच ठरते. त्यामुळे बालपणाचा काळ आरोग्यपूर्ण व आनंददायी असावा याची काळजी घेणे सरकारचे, समाजाचे कर्तव्यच ठरते. अन्यथा आर्थिक अडचणीत सापडलेल्या पालकांनी अशा परिस्थितीतून मार्ग कसा काढायचा ?

मुलांच्या निकोप वाढीसाठी पूरक सार्वजनिक सेवा उपलब्ध करून देता येईल. सार्वजनिक व खाजगी अशा दोन्ही प्रकारच्या सेवा यासाठी उपलब्ध असाव्यात. खाजगी सेवांसाठी अनुदान देता आले तर त्या सेवा स्वस्तात मिळू शकतील. मुळात यासाठी धोरणकर्त्यांचा दृष्टिकोण बदलणे गरजेचे आहे. आज, देशाच्या आर्थिक, आरोग्य व शिक्षणविषयक निर्देशांकाबाबत जशी जागरुकता आहे, हे विषय गांभीर्याने चर्चिले जातात त्याचप्रमाणे बालकांची सर्वंकष व उत्तम वाढ हा चर्चेचा विषय बनला पाहिजे.

येथे बालसंगोपनासाठी योग्य यंत्रणा असणे, तिचा दर्जा चांगला असणे आणि तिचा उपयोग सामान्य नागरिकांना करता येणे या तीन बाबींचा विचार इथे होणे आवश्यक ठरते. तसेच 'फॅमिली फ्रेंडली' धोरणे आखणेही उपयुक्त ठरावे. विशेषतः जागतिकीकरणाच्या काळात अशा धोरणांना अधिक महत्त्व प्राप्त होते. कारण, जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी कंपन्या कामगारहिताकडे दुर्लक्ष करण्याची शक्यता असते. किंबहुना अनेकदा असे दुर्लक्ष जाणीवपूर्वक केले जाते. खरे तर जागतिक व्यापार संघटनेच्या माध्यमातून अशा प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी प्रयत्न केले जाणे अपेक्षित आहे. पण दुर्दैवाने ही आंतरराष्ट्रीय संघटना कंपन्यांचे हित अधिक जपण्याचा प्रयत्न करते, असे मत Jody Heymann मांडतात. पण, कंपन्यांनी लहान मुलांप्रती/ कुटुंबांप्रती सामाजिक बांधिलकी मानली तर अशी धोरणे आखणे शक्य आहे.

कोणत्याही कार्यालयाने 'फॅमिली फ्रेंडली' धोरणे आखावीत म्हणजे नेमके काय करायचे, यासाठी उत्तर अमेरिका व युरोप येथील सर्वेक्षणांच्या आधारावर कॅनडातील 'वर्क अँड फॅमिली युनिट'ने, पाच निकष मांडले आहेत.

**(१) लवचिकता** - कार्यालयीन कामकाजाची पद्धत मुळातच लवचीक असणे. त्यामुळे कामगारांना/कर्मचाऱ्यांना कामकाज सांभाळून कौटुंबिक गरजांकडे लक्ष देता येईल. 'कौटुंबिक जबाबदारीसाठी रजा' अशी सोय करता येईल. **(२) कौटुंबिक धोरणे राबविणारे व्यवस्थापक** - कार्यालयीन व्यवहारात रुक्षता टाळून कर्मचाऱ्यांचे मोल जाणणारे आणि काम व कौटुंबिक गरजा यांच्यात समतोल राखण्यास मदत करणारे व्यवस्थापक असले तर ते कंपनीचे नुकसान होऊ देणार नाहीत. शिवाय कर्मचाऱ्यांची मानसिक स्थिती उत्तम राहील याचीही काळजी ते घेऊ शकतील. **(३) कार्यसंस्कृती** - कार्यालयांतील एकूणच कार्यसंस्कृती कुटुंबाशी मैत्री करणारी असेल. **(४) पर्यायी व्यवस्था** - कार्यालयांतील महत्त्वाचे काम अडून राहू नये यासाठी कामाच्या लवचीक वेळा, अर्धवेळ काम, काम वाटून घेण्याची सोय असे काही मार्ग अवलंबिता येतील. **(५) बालकांच्या व ज्येष्ठांच्या/वृद्धांच्या गरजा समजून घेण्याची मानसिकता** - कौटुंबिक परिस्थिती चांगली असेल तर कर्मचारी चांगले काम करू शकतात हे लक्षात घेणे गरजेचे ठरते. या दृष्टीने कर्मचाऱ्यांच्या कौटुंबिक गरजा समजून घेण्याची मानसिकता हवी.

बालकांच्या निकोप वाढीसाठी व सर्वंकष विकासासाठी 'फॅमिली फ्रेंडली' धोरणे उपयुक्त ठरतील अशी आशा करता येईल. ✿✿

# ANNOUNCEMENT

## INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY

is pleased to announce the following scheme recently introduced for subscription of the ***Journal of Indian School of Political Economy (JISPE)*** for the Block Period of Three and Five years at a substantial concession resulting in huge savings (up to 33.3%) to the new as well as existing subscribers as under, provided that the subscription amount is remitted in lump-sum on or before 1st June 2008.

| ***Subscription Category*** | ***Yearly Subscription*** | ***Three Year subscription*** | ***Five Year Subscription*** |
|---|---|---|---|
| *Universities & Institutes* | *Rs. 600/-* | *Rs. 1500* | *Rs. 2000/- Plus ** |
| ***Savings*** | ***Nil*** | ***Rs. 300/-*** | ***Rs. 1000/-*** |
| *Individuals & Colleges* | *Rs. 300/-* | *Rs. 750/-* | *Rs. 1000/-* |
| ***Savings*** | ***Nil*** | ***Rs. 150/-*** | ***Rs. 500/-*** |
| *Savings Per cent* | *Nil* | *16.2%* | *33.3%* |

* Statistical supplement to the special issue of the JISPE on 'Political Parties and Election in Indian States : 1990-2003' comprising 335 pages and costing Rs.325/- absolutely free till stocks last.

**For more details write or email to:**

The Administrative Officer,
Indian School of Political Economy,
'Arthabodh', 968/21-22, Senapati Bapat Road,
Pune 411016

Email : ispe@vsnl.net
Fax - 25657697

Phone - 25657132
- 25657210

# ध्येय एक, मार्ग अनेक

पर्यावरणविषयक विज्ञान-संशोधन जसजसे पुढे जात आहे तसतसे या संदर्भातील नवनवीन मुद्दे चर्चिले जात आहेत. या चर्चांमधून दोन गोष्टी स्पष्ट झाल्या आहेत. एक म्हणजे, पर्यावरणाची हानी मोठ्या प्रमाणावर होत आहे. दुसरी म्हणजे, चालू शतकात 'ग्लोबल वॉर्मिंग' हा काळजीचा विषय बनला आहे. त्यामुळे पर्यावरणाचे रक्षण केले पाहिजे आणि 'ग्लोबल वॉर्मिंग' कमी केले पाहिजे, या दोन्हींबाबत आता दुमत राहिलेले नाही. पण यासाठी ध्येयमार्ग कोणता असावा, याबाबत मात्र मतामतांचा गलबला आहे. यांत प्रामुख्याने चार गट पडतात - (१) बाजारपेठीय-उदारमतवादी दृष्टिकोण महत्त्वाचा मानणारे (२) संस्थात्मक दृष्टिकोणाला प्राधान्य देणारे (३)जैव - पर्यावरणवादी आणि (४) 'सोशल ग्रीन' नामक दृष्टिकोण अवलंबिणारे. यांपैकी कोणताही एक गट आपल्या भूमिकेपासून दूर जाण्याची शक्यता सध्यातरी दृष्टिक्षेपात नाही. त्यामुळे समस्या सोडविण्यासाठी सर्वच तयार, पण तरी समस्या 'जैसे थे' अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. पर्यावरणाची हानी व 'ग्लोबल वॉर्मिंग' हे विषय जगभरातील नागरिकांच्या भवितव्यासाठी महत्त्वाचे असल्याने या चारही गटांच्या भूमिका समजून घेणे गरजेचे ठरते.

**बाजारपेठीय-उदारमतवादी** गटात मोडणाऱ्या व्यक्ती बाजारपेठेचे कामकाज/ व्यवहार सुरळितपणे पार पाडावे यासाठी सुधारणा घडवून आणण्याचे आवाहन करतात. त्यांना eco-efficiency हवी असते. यात eco म्हणजे economic आणि ecological अशा दोन्ही बाजू ते समाविष्ट करतात. पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी कंपन्यांनी स्वतःहून पुढाकार घ्यावा म्हणजे 'कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी' मान्य करावी व त्या माध्यमातून काही उपक्रम राबवून पर्यावरणाचे रक्षण करावे अशी अपेक्षा केली जाते. या शिवाय तंत्रज्ञानात सुधारणा घडवून आणून तंत्रज्ञानविषयक सहकार्य वाढवावे, असेही अपेक्षित असते. विविध देशांच्या व्यवहारांतील कृत्रिम अडथळे जागतिकीकरणामुळे दूर होऊन 'जागतिक नागरिकां'मध्ये परस्परसहकार्य आणि परस्परांविषयी सहानुभूती या बाबी वाढीस लागल्या आहेत, त्यामुळे सहिष्णूतेच्या, लोकशाहीच्या आणि संपन्नतेच्या दिशेने समाज वाटचाल करू लागला आहे, असे

त्यांना वाटते. आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय जागतिकीकरण सच्च्या पर्यावरणवाद्यांनी मान्य केल्यास पर्यावरणरक्षणाच्या उद्दिष्टापर्यंत पोहचणे सोपे जाईल, असे त्यांचे प्रतिपादन आहे. जागतिकीकरणामुळे व बाजारपेठीय अर्थव्यवस्थेमुळे विविध वस्तू वा सेवा यांचे उत्पादन वाढते. अनेक प्रकारच्या नोकऱ्यांच्या संधी उपलब्ध होतात. जागतिक नागरिकाच्या हाती पैसा खुळखुळतो. क्रयशक्ती वाढल्याने नवा ग्राहकवर्ग तयार होतो. बाजारपेठेतील मागणी वाढते. म्हणजे एका अर्थाने जगातील सर्वच नागरिकांचे दरडोई उत्पन्न वाढण्याच्या शक्यता निर्माण होतात. समाज व देश उन्नतीकडे वाटचाल करतात. असे उन्नत समाज व देश पर्यावरणाच्या रक्षणाची काळजी घेण्यास तयार असतात, असे या गटाच्या भूमिकेमागील तर्कशास्त्र आहे.

आर्थिक प्रगती झाल्याखेरीज कोणत्याही देशाने वा जागतिक नागरिकांनी पर्यावरणाच्या रक्षणासाठी त्याग करावा, असे म्हणणे हे अन्यायकारक आहे, असे हा गट म्हणतो. आर्थिक प्रगती साकारण्यासाठी बाजारपेठीय व्यवहार पडद्यामागे मोठी भूमिका बजावतात. बाजारपेठेच्या शक्तीचा पुरेपूर उपयोग करून घेता यावा, यासाठी काही सुधारणा राबविणे गरजेचे ठरते. खुल्या व स्पर्धायुक्त बाजारपेठांमुळे व्यापाराला चालना मिळते. यासाठी गुंतवणूक व गुंतवणूक करण्यासाठी स्थैर्यपूर्ण आर्थिक वातावरण आवश्यक असते. बौद्धिक संपदा कायदा, अर्थव्यवहार सुरळित होण्यासाठी सुयोग्य कायदे, पारदर्शकता, करपद्धतीत सुधारणा असे विषय या दृष्टीने महत्त्वाचे ठरतात. देशोदेशींच्या सरकारांनी व्यापारविषयक अडथळे निर्माण करू नयेत यासाठी जागतिक पातळीवर नियम व कायदे असणे गरजेचे बनते. जागतिक व्यापार संघटना आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या संस्था जागतिक व्यापारासंदर्भात मोठी व महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. तथापि या विषयी आणखी प्रयत्न होण्याची गरज या गटाकडून व्यक्त केली जाते.

सातत्यशील विकासाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी 'कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी'वर हा गट भर देतो. त्यात 'आयएसओ -१४०००'च्या (ISO) निकषांप्रमाणे पर्यावरणीय व्यवस्थापनाचा दर्जा राखणे याचा तसेच 'पब्लिक-प्रायव्हेट पार्टनरशिप'चा अवलंब करणे, यांचा अंतर्भाव केला जातो. जागतिक पातळीवर विशिष्ट देशांनी उत्पादनांचा, उत्पादनप्रक्रियेचा दर्जा राखला तर पर्यावरणाचे नुकसान टाळणे शक्य होईल, असे मत हा गट मांडतो. 'वर्ल्ड बिझिनेस कौन्सिल फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट'ने तर म्हटले आहे की, "जी सरकारे अडथळे निर्माण करून उद्योगांना व्यापार करण्यापासून रोखतात

आणि नागरिकांच्या गरजा पूर्ण करण्याची जबाबदारी बाजारपेठेकडे सोपविण्याऐवजी स्वत:कडे घेतात ती आपल्या देशातील नागरिकांना आर्थिकदृष्ट्या मागासलेले ठेवतात. गरीब देशांना वा गरीब नागरिकांना व्यापारात सहभागी होण्याची संधी न देणे म्हणजे त्या नागरिकांचे व पर्यायाने वसुंधरेचे नुकसानच करणे होय''. आपल्या या प्रतिपादनाच्या पुष्ट्यर्थ या कौन्सिलने 'नागरिकांच्या आर्थिक स्वातंत्र्याचा निर्देशांक जेवढा अधिक तेवढीच मानव विकास निर्देशांकाची पातळी अधिक असते', या वस्तुस्थितीकडे लक्ष वेधले आहे. बाजारपेठीय उदारमतवादी गटातील काहींच्या मते पर्यावरणवादी नागरिक व संस्था अनेक गोष्टींचा विनाकारण बाऊ करतात. पर्यावरणाचे नुकसान होत असल्याचे शास्त्रीय पुरावे असल्याखेरीज त्यांच्या रक्षणासंदर्भात सक्रिय बनू नये असे म्हणून गैरसमज पसरविणाऱ्या अशा व्यक्ती/संस्थांपासून जागतिक पातळीवरील नेत्यांनी दूर राहावे, असे त्यांनी सुचविले आहे. पण जेव्हा वैज्ञानिक दृष्टिकोणातून पर्यावरणाच्या समस्या गंभीर रूप धारण करतात तेव्हा जागतिक पातळीवरील नेत्यांनी त्वरित व ठोस कृती करणे आवश्यक बनते. नवतंत्रज्ञानाचा अंगीकार अशा वेळी महत्त्वाचा ठरतो. विकसित देशांनी असे नवतंत्रज्ञान शोधून पर्यावरणीय नुकसान टाळले पाहिजे, तसेच विकसनशील देशांनाही ते उपलब्ध करून दिले पाहिजे. आर्थिक विकासाची गती रोखणे, चार चाकी वाहनांचा वापर थांबविणे अशा काही पर्यायांचा अवलंब करून काही साध्य होणार नाही, असे या गटाला वाटते.

**संस्थात्मक दृष्टिकोणाला** प्राधान्य देणारा गट जागतिकीकरणाची गरज, दरडोई राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होण्याची आवश्यकता, खुला व्यापार, तंत्रज्ञानविषयक देवघेव या संदर्भात बाजारपेठीय-उदारमतवादी गटाने मांडलेल्या अनेक बाबींचे समर्थन करतो. पण केवळ तेवढेच पुरेसे आहे, असे या गटाला वाटत नाही. सातत्यशील विकासासाठी केवळ बाजारपेठीय व्यवस्थेवर अवलंबून राहण्यापेक्षा आंतरराष्ट्रीय पातळीवरील संस्थांचे कार्य या दृष्टीने उपयुक्त ठरेल, असे मत हा गट मांडतो. विविध देशांमधील व्यवहारांना नियमांची, कायद्याची चौकट आखून दिली की कोणता देश कुठे चुकतो आहे, हे स्पष्ट होते. तसेच विकसित व विकसनशील देशांसाठी वेगळे नियम आखून सर्वांचीच जबाबदारी निश्चित करता येते, असे या गटाला वाटते.

पर्यावरणाबाबतच्या कायद्यांचे, नियमांचे पालन सुयोग्य पद्धतीने करण्यात आले तर पर्यावरणाचे रक्षण ही अवघड बाब ठरणार नाही. वातावरणातील बदलाचे आव्हान पेलण्यासाठी व जागतिकीकरणाचा वेग कमी न करताही अधिक संपन्नतेकडे

समाजांची वाटचाल चालू राहावी या दृष्टीने आंतरराष्ट्रीय कायदेकानू व नियम महत्त्वाची भूमिका बजावत असतात, असे या गटाचे प्रतिपादन आहे. उदारमतवादी गटाप्रमाणेच हा गटही विज्ञानाचे महत्त्व अधोरेखित करतो. मात्र विज्ञानविषयक बाबी पुढे येतात तेव्हा त्या संदर्भात वाद-प्रतिवाद होतच असतात. त्यामुळे योग्य निर्णय घेण्यासाठी वेळ लागून एकूणच प्रक्रियेचा वेग मंदावतो. अशा वेळी १९९२मध्ये झालेल्या 'रिओ डिक्लेरेशन'मध्ये १५ व्या क्रमांकाच्या तत्त्वाचा उल्लेख हा गट करतो. यात असे म्हणण्यात आले आहे की, ''पर्यावरणाची अतिशय गंभीर आणि कधीही न भरून येणारी हानी होण्याचे धोके कधीकधी काही ठिकाणी स्पष्टपणे जाणवतात. अशा वेळी या पर्यावरणीय हानीस कारणीभूत ठरणाऱ्या घटकांचे पूर्ण शास्त्रीय ज्ञान हाताशी नाही या एका कारणास्तव पर्यावरणरक्षणाचे उपाय योजण्यात दिरंगाई होता कामा नये''. पर्यावरणाचा विचार करणारा समाज व यंत्रणा आंतरराष्ट्रीय पातळीवर उभी राहावी, यासाठी हे तत्त्व महत्त्वाची भूमिका बजावते, म्हणून याचा अवलंब करण्यावर हा गट भर देतो.

संस्थात्मक भूमिका घेण्यामागे या गटाचा दृष्टिकोण असाही आहे की, पर्यावरणीय प्रश्न सोडविण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चा करून मान्य करण्यात आलेले नियम व करार हाच सर्वोत्तम मार्ग आहे. यामुळे सर्वांच्याच भूमिका समजून घेता येतात आणि सर्वांनाच न्याय मिळण्याचा मार्ग खुला होतो. तसेच राष्ट्राराष्ट्रांचे सार्वभौमत्वही कायम राहते. या प्रक्रियेतून राष्ट्राराष्ट्रांमधील सहकार्यही वाढीस लागण्याच्या शक्यता निर्माण होतात. अर्थात अशा यंत्रणा वा कायदे, नियम हे केवळ कागदोपत्री असून भागत नाही तर त्यांची अंमलबजावणी सुयोग्य पद्धतीने होण्याची गरज असते. अशा संस्थांचा/नियमांचा प्रभाव वाढण्यासाठी हे आवश्यक आहे. या संदर्भात हा गट 'क्योतो प्रोटोकॉल'कडे लक्ष वेधतो. 'क्योतो प्रोटोकॉल' सर्वांनी मंजूर करून त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. 'क्योतो प्रोटोकॉल' तसेच ओझोनचा थर विरळ होऊ नये यासाठी असलेला 'मॉन्ट्रियल प्रोटोकॉल' या दोन्हींमध्ये समन्वय असण्याचीही गरज आहे. त्याचप्रमाणे आरोग्याला अपायकारक अशा कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी असलेले 'बेसल कन्व्हेंशन', प्रदूषणकारी घटकांसंदर्भात असलेले 'स्टॉकहोम कन्व्हेंशन' आणि घातक रसायने व रासायनिक कीटकनाशके यांबाबत असलेले 'रॉटरडॅम कन्व्हेंशन' यांच्यातही समन्वय साधण्याची आवश्यकता असल्याचे या गटाचे म्हणणे आहे.

संस्थात्मक दृष्टिकोण अवलंबिताना काही जण तर 'वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन' प्रमाणे (WTO) 'वर्ल्ड एन्व्हायर्नमेंट ऑर्गनायझेशन'ची (WEO) कल्पना पुढे आणतात. संयुक्त राष्ट्रसंघाचा पर्यावरणविषयक कृती कार्यक्रम (United Nations Environment Programme) हा फारसा प्रभावी ठरत नसल्याने त्याची जागा 'वर्ल्ड एन्व्हायर्नमेंट ऑर्गनायझेशन'ने घ्यावी, असे ते सुचवितात. तसेच पर्यावरणासंबंधीच्या करारांची अंमलबजावणी करण्याचे अधिकार या संघटनेला देण्यात आले तर ते अधिक योग्य ठरेल, असेही म्हटले जाते. विविध देशांच्या सरकारांनी आणि त्यांच्या प्रशासनांनी पर्यावरणविषयक धोरणे अधिक प्रभावी पद्धतीने राबविण्यावर हा गट भर देतो.

**जैव -पर्यावरणवादी गटा**च्या मते पर्यावरणाचे नुकसान इतक्या मोठ्या प्रमाणावर झाले आहे की आता तेथून परत पूर्वस्थितीवर येणे शक्य नाही आणि त्यामुळे विनाश अटळ आहे. इतर प्राण्यांप्रमाणे माणूस हा एक प्राणीच आहे आणि जगण्यासाठीच त्याच्या क्रिया-प्रतिक्रिया घडून येतात. जगण्याची अशी एक ऊर्मी असते वा स्वार्थ असतो, असे म्हणता येईल. त्यामुळे, या पृथ्वीतलावरील माणूस ही एक प्रजाती असून पृथ्वीच्या परिसंस्थांमधील ती एक 'समस्या'च आहे. जनुकीय बदलांमुळे मानवाला इतर प्राण्यांच्या तुलनेत अधिक बुद्धिमत्ता मिळाली, त्याचा शारीरिक, मानसिक विकासही वेगाने होत गेला. विज्ञानाच्या मदतीने त्याने अनेक क्षेत्रे पादाक्रांत केली. निसर्गाचा भरपूर उपभोग त्याने घेतला. पण आता मानवाचा भार सोसण्याची पृथ्वीची क्षमता (carrying capacity) संपुष्टात आली आहे. त्यामुळे आजच्या पर्यावरणाच्या संकटाला सामोरे जाण्यासाठी विचारसरणीत व कृतीत आमूलाग्र बदल करण्याची गरज निर्माण झाली आहे. पूर्णपणे नव्या राजकीय, सामाजिक व आर्थिक विचारसरणीचा स्वीकार करण्याची आवश्यकता या गटाला वाटते.

लोकसंख्यावाढीवर त्वरित नियंत्रण आणण्यावर हा गट भर देतो. किंबहुना या गटातील काही जण तर टोकाला जाऊन असेही म्हणतात की, लोकसंख्येवर नियंत्रण न ठेवणाऱ्या देशांना कोणत्याच प्रकारची मदतही करण्यात येऊ नये. लोकसंख्यावाढीचा बॉंब जगाला नष्ट करणार आहे. त्यामुळे हा स्फोट न होऊ देणे हेच मानवजातीच्या हिताचे आहे, असे प्रतिपादन हा गट करतो. लोकसंख्यावाढीचा वेग मंदावला आहे किंवा नाही अशा चर्चेमध्ये न अडकता कायमच लोकसंख्यावाढीवर नियंत्रण आणणे सदासर्वकाळच निकडीचे आहे, असे हा गट ठामपणे म्हणतो. यासाठी वेळप्रसंगी नागरिकांवर सक्ती करण्यासही मागे-पुढे पाहू नये असेही सुचविले जाते. लोकसंख्येवर

नियंत्रण आणण्यासाठी सक्ती करणे हे मानवाधिकारांचे उल्लंघन ठरते, असा मतप्रवाह पुढे आल्यानंतर मात्र या गटाने आपली भूमिका सौम्य केली आहे. या संदर्भात नागरिकांचे शिक्षण-प्रबोधन, आरोग्याबाबत जागरुकता आणि कुटुंबनियोजनाच्या साधनांचा वापर या बाबींवर भर देण्याचे त्यांनी ठरविले आहे. प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाला प्राधान्य देऊन मुलींची व महिलांची साक्षरता व या संदर्भातील जागरुकता वाढविणे हे आता त्यांच्या दृष्टीने निकडीचे झाले आहे.

याचबरोबर आर्थिक वाढ आणि उपभोग यांवर नियंत्रण असणे हेही या गटाला महत्त्वाचे वाटते. या दोन्ही बाबी अनियंत्रित असल्या तर पर्यावरणाचा ऱ्हास सातत्याने होतच जातो आणि सातत्यशील विकासाची संकल्पना वास्तवार उतरण्याची शक्यता दूरच राहते, असे त्यांना ठामपणे वाटते. यासाठी विकसित देशांतील नागरिकांनी आपली जीवनशैली बदलली पाहिजे. तसेच विकसनशील देशांमधून विकसित देशांकडे होणारे स्थलांतरही रोखले पाहिजे, असे हा गट सुचवितो. जीवनशैली बदलण्यासाठी-देखील सक्तीचा मार्ग अवलंबिण्यापेक्षा प्रबोधनावर भर देण्याचा मुद्दा या गटातील मवाळ उचलून धरतात. पर्यावरणाशी मैत्री करणाऱ्या जीवनशैलीचा स्वीकार करताना उपभोगाच्या वस्तू वा सेवा वापरताना त्यांतील आवश्यकता तपासून पाहणे, आवश्यकता असतानाही त्या कमी प्रमाणात वापरल्या जातील असे पाहणे, पुनर्वापरावर भर देणे असे काही उपाय सुचविण्यात येतात. सातत्यशील विकासाच्या केंद्रबिंदूपासून दूर न जाता जे काही करता येणे शक्य आहे ते करण्याचे प्रयत्न या गटातर्फे करण्यात येतात.

ठोकळ देशी उत्पादन (ग्रॉस डोमेस्टिक प्रॉडक्ट -जीडीपी) आणि ठोकळ राष्ट्रीय उत्पादन (ग्रॉस नॅशनल प्रॉडक्ट - जीएनपी) यांवरच भर देण्यापेक्षा 'इंडेक्स ऑफ सस्टेनेबल इकॉनॉमिक वेल्फेअर' (आयएसईडब्लू) या गटाला महत्त्वाचा वाटतो. उत्पन्नातील विषमता, प्रदूषण, नैसर्गिक साधनसामग्री व भांडवलाचा ऱ्हास, घरगुती श्रमाचे मूल्य या व यांसारख्या ठोकळ देशी उत्पादन अथवा राष्ट्रीय उत्पादनांमध्ये ज्यांची गणना केली जात नाही अशा असंख्य घटकांची तारतम्याने दखल घेऊन त्यानुसार मोजमाप केलेला उपभोगावरील दरडोई वास्तव खर्च म्हणजे 'आयएसईडब्लू' होय. अधिक उत्पादन व अधिक उपभोग याला हा गट विरोध करतोच, शिवाय अधिक उत्पादनावर, व्यापारावर नियंत्रणही आणावे असे म्हणतो. पर्यावरणीय संकट टाळण्यासाठी सर्वप्रथम जीवनविषयक मानवी मूल्यांमध्ये आमूलाग्र बदल घडून येण्याची नितांत गरज या गटाला वाटते.

**सोशल ग्रीन** हा दृष्टिकोण स्वीकारणाऱ्या गटाला सामाजिक व पर्यावरणीय न्याय या दोन बाबी सर्वांत महत्त्वाच्या वाटतात. केवळ नैतिकतेच्या दृष्टिकोणातून ही भूमिका स्वीकारण्यात आलेली नाही. तर, या दोन बाबींना प्राधान्य देण्यात आले नाही तर पर्यावरणीय संकट टाळणे अशक्यच आहे, असे या गटाचे प्रतिपादन आहे. अधिकाधिक उपभोग या संकल्पनेपासून दूर जाण्याची गरज हा जैव-पर्यावरणवादी गटाचा विचार या गटालाही मान्य आहे. तथापि हा गट जागतिकीकरणाला विरोध करून सामाजिक न्यायासाठी नागरिकांच्या सहभागाला अधिक महत्त्व देतो. प्रत्येकाला आपली जबाबदारी कळणे, उद्योगांनीही अशी जबाबदारी ओळखून ध्येयनिश्चिती करणे आणि सर्वांनीच उपभोगावर मर्यादा आणणे हे गरजेचे आहे. राजकीय धोरणे आणि संस्थात्मक उद्दिष्टे या दोन्ही बाबी विचारात घेता नागरिकांचा सहभाग अधिक उपयुक्त ठरू शकतो., अशी या गटाची भूमिका आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील संस्थांचे महत्त्व कमी होण्यासाठी, उत्पादन व व्यापाराच्या पद्धतींमध्ये बदल घडून येण्यासाठी, विकसनशील देशांची कर्जे माफ होण्यासाठी आणि स्थानिकांच्या सहभागाने स्थानिक अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे हे नागरिकांना करता येईल. जागतिक व्यापार संघटनेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या कृतिकार्यक्रमांचे मूल्यमापन पर्यावरणाच्या दृष्टिकोणातून केले जाईपर्यंत तरी या संबंधी चर्चा फेटाळणे हे गरजेचे आहे. या गटातील काहींना तर जागतिक व्यापार संघटनेचा गाशा गुंडाळला जावा असेही वाटते.

मानवाधिकारांची जपणूक, कामगारांबरोबर न्याय्य वर्तणूक, पर्यावरणाचे रक्षण आणि परदेशी वस्तूंपेक्षा स्थानिक उद्योगांनी तयार केलेल्या वस्तूंना प्राधान्य असे काही मुद्दे हा गट पुढे आणतो. 'ग्रीनपीस' सारख्या पर्यावरणविषयक कार्य करणाऱ्या संस्था या आधी उल्लेख केलेल्या 'रिओ डिक्लेरेशन'मधील १५ व्या क्रमांकाच्या खबरदारीच्या तत्त्वाचा जागतिक व्यापार संघटनेत समावेश व्हावा याचा आग्रह धरतात. आंतरराष्ट्रीय व्यापार टाळता येत नाही तेव्हा न्याय्य व्यापाराचा (fair trade) मुद्दा मांडण्यात हा गट आघाडीवर असतो. जागतिकीकरणाच्या विरोधात भूमिका घेताना हा गट स्वाभाविकपणे स्थानिकीकरणाला प्राधान्य देतो. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आर्थिकदृष्ट्या पिछाडीवर पडलेल्या नागरिकांच्या बाजूने आवाज उठविण्याचा प्रयत्न हा गट करतो. यात प्रामुख्याने स्थानिक जाती-जमाती, महिला आणि आपल्या जमिनीवरील हक्क सोडून स्थलांतरित झालेले नागरिक यांचा समावेश होतो.

पर्यावरणाची काळजी असणाऱ्या या विविध गटांच्या दृष्टिकोणांत मुळातच फरक असल्याने आणि त्यामुळे त्यांचे मार्ग भिन्न असल्याने त्यांच्यात एक प्रकारे वैचारिक संघर्ष उद्‌भवतो किंवा कसे हा प्रश्न आता उपस्थित होतो. बाजारपेठी उदारमतवादी आणि संस्थावादी या दोन गटांमध्ये थोडे मतभेद आहेत. संस्थावादी गटाच्या भूमिकेमुळे आर्थिक विकास घडून येण्यात अडचणी निर्माण होतात, असे उदारमतवादी गटाला वाटते. या गटाला सरकारचे/संस्थांचे नियंत्रण नकोच असते. पर्यावरणविषयक जागतिक करारही या गटाला मान्य असतात, असे नाही. 'सोशल ग्रीन्स' आणि जैव-पर्यावरणवादी गटाची जागतिकीकरणाच्या विरोधातील निदर्शने ही चुकीची असून त्यामुळे जगाचे अहितच होते, असे उदारमतवादी गटाचे स्पष्ट मत आहे. 'सोशल ग्रीन्स' आणि जैव-पर्यावरणवादी यांच्यात काही बाबतींत युती असून या दोन्ही गटांचा बाजारपेठीय उदारमतवादी गटाला ठाम विरोध आहे. पर्यावरण रक्षणासाठी मोठे उद्योग स्वेच्छेने काही कृती करतील, यावर त्यांचा विश्वास नाही. पर्यावरणाची काळजी घेतली जाईल अशा तंत्रज्ञानाची निर्मिती करून ते विकसनशील देशांना पुरवण्याबाबतही फारसे काही घडलेले दिसत नाही. तसेच यासाठी केवळ पाश्चात्य विज्ञानावर अवलंबून राहणेही योग्य नाही, असे या गटांना वाटते. स्थानिकीकरणाला 'सोशल ग्रीन्स' महत्त्व देतात. बाजारपेठीय उदारमतवादीदेखील स्थानिक बाजारपेठेला काही प्रमाणात महत्त्व देतात. या दोन्ही गटांना संस्थावाद्यांचे म्हणणे पटत नाही. या सर्व प्रश्नांचे स्वरूप पाहता संस्थावाद्यांचे प्रयत्न फारच तोकडे पडतात, असे त्यांना वाटते.

आता प्रश्न असा आहे की पर्यावरणविषयक जागतिक धोरणाचा विचार करायचा असेल तर तो कशा पद्धतीने करावा ? बाजारपेठीय उदारमतवादी आणि संस्थावादी यांच्या मतांचा सध्या अवलंब केला जाताना दिसतो, असे अनेकांना वाटते. अलीकडे जैव-पर्यावरणवादी आणि 'सोशल ग्रीन्स' हेही आपली मते ठासून मांडत असल्याने आणि काही प्रमाणात त्यांच्या मतांचा प्रभाव पडत असल्याचेही दिसते. पण, अभ्यासकांनी आणि सामान्य नागरिकांनी नेमकी कोणती भूमिका घ्यावी याबाबत एकच उत्तर शोधणे खरोखरीच कठीण आहे. त्यामुळे सर्वांनी परस्परांच्या भूमिकेचा, विचारांचा आदर करावा, आपल्याच मताचा दुराग्रह बाजूला ठेवून दुसऱ्याचे विचार समजून घेण्याचा व त्यानुसार विज्ञानाच्या आधारे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केल्यास उत्तम. पर्यावरणाचा व 'ग्लोबल वॉर्मिंग'चा प्रश्न अतिशय गुंतागुंतीचा असल्याने त्याचा विचार सर्व मार्गांनी होणे गरजेचे बनले आहे. त्यातच जगाचे हित आहे. ✿✿

# कूच-आगेकूच चळवळीची

अतिशय थोड्या अवधीतच अतिशय वेगाने फोफावलेल्या अलीकडील काळातील चळवळींची जंत्री करावयाची म्हटले तर, पर्यावरण रक्षण -संगोपन - संवर्धनाच्या चळवळीला त्या यादीत अग्रमानांकन बहाल करावे लागेल. याचे कारणही तसे साधे सरळ आहे. मुळात, पर्यावरण संगोपनाचा हा मुद्दा एकंदरच मानवी विकासाच्या प्रक्रियेचे जुळे भावंड आहे. आणि आर्थिक विकासाचा विचार वैश्विक स्तरावरील आर्थिक-सामाजिक चर्चा-परिसंवादाचा केंद्रबिंदू ठरू लागला तो दुसऱ्या महायुद्धानंतरच. आज चांगली ऐसपैस विस्तारलेली 'विकासाचे अर्थशास्त्र' ही अर्थशास्त्रीय अभ्यास-संशोधनाची शाखाच मुळात अर्थविकासविषयक चर्चेच्या क्षितिजावर बऱ्यापैकी सुसंघटित स्वरूपात प्रगट होण्यास सुरुवात झाली ती १९५०च्या आसपास. या शाखेची एक उपशाखा म्हणजे सातत्यशील आर्थिक विकासाच्या (सस्टेनेबल डेव्हलपमेन्ट) पैलूचा विचार. हा विचारही तसा खूपच अलीकडचा, म्हणजे, १९८०च्या दशकातील. नाही म्हणायला या विचाराचे बीजारोपण पहिल्या जगातील विकसित देशांमध्ये १९६०च्या दशकातच झाले असले तरी त्या बाबतच्या चर्चेचे रूपांतर विशाल शाल्मली वृक्षात घडून आले ते मात्र १९८०च्या दशकापासून. आज मात्र, सातत्यशील आर्थिक विकासाची आणि पर्यायाने पर्यावरणीय संगोपनाची चर्चा-चळवळ वैश्विक विचारविश्वाचा एक मोठा,महत्त्वाचा आणि दुर्लक्ष करता न येण्याजोगा हिस्सा बनली आहे. एका परीने, या चळवळीच्या आजवरच्या प्रवासाचा इतिहास म्हणजे जागतिक स्तरावरील एकंदरच मानवी विकासाच्या प्रक्रियेतील वाकवळणांचा, त्या प्रक्रियेला दिशा देत तिची जडणघडण करणाऱ्या घटकांमध्ये घडून आलेल्या बदलांचा इतिहास ठरतो.

सुमारे १० हजार वर्षांपूर्वी लागलेला शेतीचा शोध हे एकंदर मानवी उत्क्रांतीच्या प्रवासातीलच केवळ नव्हे तर, जागतिक पर्यावरणाच्या लेखीही एक विलक्षण महत्त्वाचे वळण मानावयास हवे. मुळातच मर्यादित असलेली मानवी लोकसंख्या आणि विखुरलेली तुरळक मानवी वस्ती यांच्या तुलनेत मुबलक असणाऱ्या नैसर्गिक साधनसंपत्तीमुळे पर्यावरणाची काही समस्या निर्माण व्हावी, हे तेव्हा अप्रस्तुतच होते. मात्र, तरीही शेतीच्या विकासाबरोबर लोकसंख्येत पडणाऱ्या भरीपायी नैसर्गिक साधनसंपत्तीच्या

कार्यक्षम वापर -व्यवस्थापानाचे आव्हान तत्कालीन मानवी समूहासमोर उभे ठाकत होतेच, याचे काही दाखले जुन्या इतिहासात सापडतातच. कालव्यांद्वारे खेळविलेल्या पाण्यामुळे जमिनीमध्ये काही विशिष्ट विषारी क्षारांचा फैलाव झाल्याने सुमारे चार हजार वर्षांपूर्वी झालेले मेसापोटेमियाचे पतन ही जमीनवापराच्या बिघडलेल्या व्यवस्थापनाचीच एक झलक असल्याचे पर्यावरण तज्ज्ञांचे अनुमान आहे.

पर्यावरणाच्या रक्षण -संवर्धनाचा मुद्दा एक 'समस्या' या स्वरूपात समोर उभा ठाकू लागला तो मात्र १७व्या शतकातील औद्योगिक क्रांतीनंतर. विशेषतः प्रगत जगातील औद्योगीकरणाने या क्रांतीनंतर जो झपाटा पकडला त्याला ऊर्जेची ऊब मिळाली ती ज्वलनशील खनिज साधनांच्या वापराद्वारे - इंधन म्हणून मोठ्या प्रमाणावर वापरल्या जाणाऱ्या मुख्यतः खनिज कोळशाच्या वापरातून. औद्योगिक क्रांती - आधुनिक ज्ञान-विज्ञानाचा प्रचार, प्रसार व अंगीकार -नवनवीन शास्त्रीय शोध - विस्तारणारे औद्योगीकरण - वाढते यांत्रिकीकरण - वाढती सुबत्ता - वाढती लोकसंख्या - वेगाने साकारणारे शहरीकरण - यामुळे नंतरच्या काळात ऊर्जेची मागणी दणकून वाढू लागली. वाढती राहिली. पर्यायाने कोळशाचा वापर मोठ्या धूमधडाक्याने सुरू झाला. कोळशाच्या वापरापायी होणारे हवेचे प्रदूषण किती जीवघेणे असू शकते याची प्रचिती प्रथम आली ती लंडनवासियांना. लंडनला वेढणाऱ्या औष्णिक धुक्याने १८७३ साली लंडनला पहिला तडाखा दिला. या धुक्याने तब्बल ११५०पेक्षा अधिक लंडनवासी नागरिकांचा बळी घेतला. उद्योगांच्या विस्ताराबरोबर वाढत्या इंधनवापरापायी पर्यावरणाच्या ढळणाऱ्या संतुलनाचे परिणाम वेगवेगळ्या स्वरूपात तेथून जगभरात ठिकठिकाणी अधूनमधून जाणवू लागले. जमिनीसह एकंदरच नैसर्गिक साधनसंपत्तीच्या अयोग्य वापर-व्यवस्थापनापायी उद्‌भवलेल्या दुष्काळ, धुळीची वादळे, शेतीची धूळदाण व पिकाऊ जमिनींच्या कसाचा ऱ्हास यांसारख्या बाबींचा प्रत्यय पश्चिम कॅनडा आणि अमेरिकेला १९३०च्या दशकात येऊ लागला.

जगाची लोकसंख्या १९५० साली २५० कोटींवर पोहोचली. त्यापूर्वी सुमारे दोन शतके फोफावलेल्या औद्योगीकरणाचे विविधांगी दुष्परिणाम आता अधिक तीव्रतेने अनुभवास येऊ लागले. कारखान्यांमधून हवेत सोडला जाणारा धूर आणि धुके यांच्या एकत्रित मिश्रणाने १९५२ साली लंडनमध्ये चार हजार नागरिकांचा बळी घेतला. त्याच्या पुढच्याच वर्षी, म्हणजे १९५३ साली, याच दुर्घटनेची पुनरावृत्ती न्यूयॉर्कमध्ये होऊन २०० नागरिक मृत्युमुखी पडले. उद्योगधंद्यांनी पाण्यामध्ये सोडून दिलेल्या

पाऱ्यामुळे दूषित बनलेले सागरजन्य खाद्यपदार्थ खाल्ल्याने जपानच्या मिनामाटा प्रांतातील नागरिकांना विषबाधा होत असल्याचे वैज्ञानिकांनी जगासमोर अधिकृतरीत्या मांडले. या विषबाधेमुळे शेकडो नागरिक प्राणाला मुकले तर मेंदूला क्षती पोहोचण्याबरोबरच अन्य जन्मजात व्यंगांनी कित्येकांवर घाला घातला.

थेट १८व्या शतकापासून ते २०व्या शतकाच्या मध्यापर्यंत पर्यावरणवादाने जगभरात हळूहळू जे मूळ धरले त्याचा संबंध एकीकडे औद्योगिक जगतातील आरंभीच्या या साऱ्या उलथापालथींशी आहे. तर, दुसऱ्या बाजूने त्याची नाळ युरोपीय शक्तींनी तिसऱ्या जगात थाटलेल्या वसाहतींशीही जुळलेली दिसते. औद्योगिक क्रांतीसाठी अनिवार्य असणाऱ्या कच्च्या मालाचा पुरवठा बिनघोर व्हावा यासाठी आशिया, आफ्रिका तसेच लॅटिन अमेरिकेतील भूप्रदेश आपल्या पंखाखाली घेतलेल्या या युरोपीय शासकांनी पर्यावरण रक्षण -संवर्धनाच्या पश्चिमी प्रारुपांची लागवड वासाहतिक प्रदेशांत केली. डोंगर उतारावरील जंगले जाळून तेथे केल्या जाणाऱ्या फिरत्या शेतीवर पाबंदी जारी करणे, अनिर्बंध शिकारींना पायबंद घालणे हे त्या उपाययोजनांचे स्वरूप होते. म्हणजेच, पहिल्या जगातील विकसित देशांमध्ये आणि त्याचप्रमाणे तिसऱ्या जगातील विकसनशील देशांमध्ये पर्यावरणाच्या संगोपन -संवर्धनाबाबतची जागृती जवळपास समांतर परंतु वेगवेगळ्या माध्यमांतून आणि निरनिराळ्या प्रेरणांद्वारे घडून येत होती. या प्रयत्नांचे सुसूत्रीकरण करण्यास हात घातला तो संयुक्त राष्ट्रसंघाने. पर्यावरणीय रक्षण - संगोपनासंबंधातील उपाय -उपक्रम -विचारविनिमय तसेच चर्चेस मिळालेले हे एक नवीन आणि तितकेच महत्वाचे वळण. १९४८ साली झालेली 'इंटरनॅशनल युनियन फॉर द प्रोटेक्शन ऑफ नेचर'ची स्थापना हे त्या प्रयत्नांचे दृश्य फळ. याच व्यासपीठाचे १९५६ साली 'इंटरनॅशनल युनियन फॉर कॉन्झर्वेशन ऑफ नेचर अॅन्ड नॅचरल रीसोर्सेस्' असे नव्याने बारसे झाले.

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या दोन दशकांदरम्यान जागतिक अर्थव्यवस्था ज्या जोमदार गतीने आगेकूच करीत राहिली त्यामुळे पर्यावरणाच्या रक्षण - संगोपन -संवर्धनाचा मुद्दा पुन्हा एकवार अग्रक्रमाने ऐरणीवर आला. झपाट्याने विस्तारणाऱ्या औद्योगीकरणाचे पर्यावरणावर होणारे अतिक्रमण आणि त्यापायी नैसर्गिक संपत्तीचा होणारा ऱ्हास, हा पैलू या विचारमंथनाच्या केंद्रस्थानी होता. औद्योगिक विस्तारामुळे निसर्गावर होणाऱ्या आक्रमणाच्या विरोधात पहिल्या जगातील देशांमध्ये सघनपणे चिंता व्यक्त होऊ लागली. ही चिंता दुहेरी होती. तिचे एक टोक आण्विक शस्त्रांच्या विस्ताराकडे रोखलेले होते.

तर, दुसरीकडे रासायनिक खतांच्या वापरामुळे होणाऱ्या पर्यावरणीय प्रदूषणाबाबतही जनजागृती आणि मोर्चेबांधणी याच काळात प्रकर्षाने होऊ लागली.

वाढत्या वैश्विक समृद्धीबरोबरच वाढणाऱ्या लोकसंख्येची अन्नधान्याची वाढती गरज भागविण्यासाठी शेतीची उत्पादकता आणि उत्पादन यांत वेगाने वाढ घडवून आणणे हे अपरिहार्यच होते. नवनवीन, वाढीव क्षेत्र लागवडीखाली आणणे हा त्यासाठीचा एक पर्याय होता. जंगलांची गच्छंती होणे हे मग स्वाभाविकच आणि अपरिहार्य होते. अन्नधान्योत्पादन वाढविण्याचा दुसरा पर्याय म्हणजे लागवडीखाली असलेल्या जमिनीतूनच वाढीव उत्पादन घ्यावयाचे. त्यासाठी रासायनिक खतांचा वाढत्या प्रमाणावरील वापराचा पर्याय जगभरातच अवलंबला गेला. त्याची परिणती परिसरातील जैववैविध्याची हानी होण्यात होत असल्याचे लवकरच ध्यानी आले. साहजिकच पर्यावरणीय संगोपनाच्या साऱ्या चर्चेचा रोख मग रासायनिक खतांच्या उपयोजनामुळे होणाऱ्या जैववैविध्याच्या हानीकडे वळला. त्यातूनच, जागतिक स्तरावरील जैववैविध्याचे संरक्षण करण्याच्या उद्देश्याने 'वर्ल्ड वाइल्डलाइफ फंड' हे व्यासपीठ १९६१ साली अस्तित्वात आले.

## पर्यावरण रक्षण आणि विकसनशील देश

पर्यावरण रक्षणाच्या चर्चा-चळवळीला १९६०च्या दशकात आणखी एक परिमाण लाभले. ते होते विकसनशील देशांमधील नवविकासाचे. तसे पाहिले तर एकंदरच जागतिक अर्थव्यवस्था १९६०च्या दशकात वार्षिक सरासरी पाच ते सहा टक्के दराने वर्धिष्णू राहिली. याच दरम्यान जागतिक स्तरावरील व्यापार तसेच गुंतवणुकीचे एकत्रीकरण होण्याची प्रक्रियाही आपले अस्तित्व दाखवू लागली होती. तिला वेगही येत होता. युरोपीय देशांचा आफ्रिका तसेच आशिया खंडांतील वासाहतिक अंमलही याच दशकात जवळपास संपूर्णतः नामशेष होत आला होता. साम्राज्यवादी वसाहतवादाच्या विरोधात या खंडांतील देशांमध्ये उफाळून आलेल्या चळवळी, तसे पाहिले तर, १९४०च्या दशकापासूनच उत्तरोत्तर तीव्र बनत होत्या. त्याचे परिणामस्वरूप, बहुतेक देशांना १९६०च्या दशकापर्यंत स्वातंत्र्य मिळाले. वसाहतवादाचे जोखड मानेवरून उतरलेले हे नवस्वतंत्र देश सर्वांगीण आर्थिक प्रगतीच्या वाटेवर वेगाने वाटचाल करण्याची धोरणे आखत-राबवत होते.

आर्थिक विकासाच्या संदर्भात या देशांपुढे आदर्श होता तो पहिल्या जगातील विकसित देशांनी साध्य केलेल्या भरभक्कम प्रगतीचा आणि त्यासाठी अवलंबलेल्या 'मॉडेल्स'चा. विकासाचे हे 'मॉडेल' होते वेगवान औद्योगीकरणप्रधान आर्थिक प्रगतीचे.

परंतु, ज्या मार्गाने पहिल्या जगातील विकसित देशांनी आपला आर्थिक अभ्युदय साध्य केला तो मार्ग आपल्याला तसाच्यातसा चोखाळता येणार नाही, आपण कितीही धावाधाव केली तरी 'पहिले जग' आणि 'तिसरे जग' यांच्यातील विकासाची दरी अनुल्लंघ्यच असल्याचा साक्षात्कार विकसनशील देशांना अल्पावधीतच झाला. विकसनशील देशांकडून विकसित देशांना निर्यात होणारा कच्चा माल आणि विकसित देशांकडून विकसनशील देशांच्या बाजारपेठांत विकली जाणारी औद्योगिक उत्पादने यांच्या तौलनिक किंमतींतील तफावत ही सातत्याने वाढतीच राहिल्याने देशांच्या या उभय समुदायांमधील विकासाची दरीही उत्तरोत्तर रुंदावतच राहिली.

या वाढत्या दरीने 'सोशल ग्रीन्स' तसेच जैवपर्यावरणवादी विचारसरणीच्या प्रवर्तक-समर्थकांना पर्यावरणसंगोपनाबाबत ठाम भूमिका घेण्यास भरपूर साधनसामग्री पुरविली. विकसनशील देशांमधील वाढती लोकसंख्या आणि अशा वाढत्या लोकसंख्येच्या नानाविध गरजांची पूर्तता करण्यापायी स्थानीय नैसर्गिक साधनसामग्रीवर येणारा ताण ध्यानात घेता, एक ना एक दिवस, नैसर्गिक साधनसंपत्तीच्या उपलब्ध मर्यादित साठ्यांचा पुरेपूर वापर होऊन परिणामी उभ्या जगातीलच मानवी समूहाच्या अस्तित्वावर आच येईल, या संभाव्य धोक्याचा आग्रही प्रचार -प्रसार जैवपर्यावरणवादी गट करू लागला. जैवपर्यावरणवाद्यांची ही भूमिका 'सोशल ग्रीन्स' गटानेही उचलून धरली. परंतु, पर्यावरणाचा हा ऱ्हास रोखण्यासाठी तिसऱ्या जगातील लोकसंख्यावाढीस पायबंद घालावयास हवा, या जैवपर्यावरणवाद्यांच्या धोशात सूर मिसळण्यास मात्र 'सोशल ग्रीन्स'ने नकार दर्शविला. त्यामुळे, तिसऱ्या जगाला जैवपर्यावरणवाद्यांपेक्षा 'सोशल ग्रीन्स' अधिक जवळचे वाटू लागले.

पर्यावरणाच्या संगोपन -संवर्धनाची अनिवार्यता अधोरेखित करणारे वैचारिक शास्त्रीय - वैज्ञानिक तसेच संशोधकीय साहित्य पुस्तकरूपाने सुजाण नागरिकांसमोर येणे, पर्यावरणाच्या रक्षणासाठी कॅनडा व अमेरिकेसह एकंदरच विकसित देशांमध्ये संस्थात्मक प्रयत्नांना चालना मिळणे यांसारख्या घटना-उपक्रमांनी पर्यावरण रक्षणाच्या जागृतिबाबतची चळवळ १९६० तसेच १९७०च्या दशकात चैतन्यमय राहिली. औद्योगीकरण, लोकसंख्या वाढ, नैसर्गिक साधनसंपत्तीचा नाश, कुपोषण आणि प्रदूषण यांच्यातील घनिष्ठ आंतरसंबंध 'Limits to Growth' सारख्या दिगंत गाजलेल्या पुस्तकाने जगासमोर मांडला तो याच सुमारास. वेगाने विस्तारणारे औद्योगीकरण - वाढती लोकसंख्या आणि तिच्या भरणपोषणापायी नैसर्गिक संपत्तीवर पडणारा ताण हा

चक्रनेमिक्रम रोखला नाही तर अंतिमतः प्रस्थापित औद्योगिक क्षमता आणि लोकसंख्या यांचा ऱ्हास आज ना उद्या अटळ आहे, असे इशारे या साऱ्या चर्चा-विचारविनिमय तसेच लेखन-प्रकाशनांद्वारे प्रकर्षाने प्रसृत होऊ लागले.

स्वीडनमधील स्टॉकहोम येथे १९७३ सालच्या जून महिन्यात संयुक्त राष्ट्रसंघाच्याविद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या पहिल्यावहिल्या जागतिक मानवी पर्यावरणविषयक शिखर परिषदेमध्ये या साऱ्या जागृतीची परिणती झाली. जगभरातील ११३ देशांमधील प्रतिनिधींनी या परिषदेस लावलेली हजेरी ही तिची सर्वांत मोठी कमाई होती. मुख्यतः औद्योगीकरणातून निपजणाऱ्या, पहिल्या जगातील विकसित देशांच्या जिव्हाळ्याच्या असणाऱ्या पर्यावरणीय समस्या या प्रारंभी स्टॉकहोम परिषदेच्या कार्यक्रम पत्रिकेवरील गाभा विषय होता. त्यातही पुन्हा, आंतरराष्ट्रीय स्तरावरील सहकार्य व सामंजस्याच्या माध्यमातून ज्या समस्यांचे समाधानकारक निराकरण करता येईल, अशा समस्यांवर आदानप्रदान घडवून आणण्याचा परिषदेचा मानस होता. मात्र, या परिषदेस विकसनशील देशांचाही पाठिंबा लाभावा यासाठी, नंतर, एकंदरच आर्थिक विकासविषयक अन्य संलग्न विषयांचाही अंतर्भाव परिषदेच्या विचारविश्वात आवर्जून केला गेला. पर्यावरणाच्या संगोपन-संवर्धनाची सांगड गरिबी निवारणाच्या समस्येशी प्रथमच घातली गेली, हे स्टॉकहोम परिषदेचे वैशिष्ट्य. गरिबीमुळे निपजणारे सर्व प्रकारचे पर्यावरणीय प्रदूषण रोखण्या-हटवण्यासाठी आर्थिक विकास हे सूत्र स्टॉकहोम परिषदेमध्ये मांडले गेले. अशा विकासासाठी औद्योगीकरण अगत्याचे अशीही भूमिका या परिषदेच्या व्यासपीठवरून प्रतिपादन केली गेली. 'गरिबी हेच प्रदूषण' हे घोषवाक्य या परिषदेने रूढ केले. दारिद्र्य हाच पर्यावरणाला भेडसावणारा सर्वांत मोठा धोका आहे, या मताचा पुरस्कार स्टॉकहोम परिषदेच्या व्यासपीठवरून करण्यात आला.

परंतु, विकसनशील देशांच्या गटात एका संशयवल्लीचे बीजारोपण होणे, हा या परिषदेतील एक मोठाच विरोधाभास ठरला. पर्यावरण रक्षणाचा घोष म्हणजे, औद्योगीकरण तसेच त्यांमधून निपजणाऱ्या आर्थिक प्रगतीच्या लाभांपासून आपल्याला वंचित ठेवण्याचा विकसित देशांचा कावा आहे, असा परिषदेस उपस्थित असलेल्या विकसनशील देशांची दृढ धारणा बनली. 'प्रदूषण ही श्रीमंतांचीच समस्या आहे', असा पुकारा करीत ब्राझीलने तर, औद्योगिक प्रदूषणाच्या प्रश्नाबाबत चर्चा करण्यातही आपल्याला रस नसल्याचे जाहीरच करून टाकले ! आयव्हरी कोस्टच्या प्रतिनिधीने तर आपले पाऊल त्याहीपुढे टाकले. वाढणारे प्रदूषण हे जर गतिमान औद्योगीकरणाचे

द्योतक असेल, अधिक प्रदूषण म्हणजे अधिक औद्योगिक विकास असे जर समीकरण असेल तर अशा प्रदूषणाचे आम्ही स्वागतच करू, असे त्याने ऐलानच केले !! किंबहुना, भांडवलशाही देशांनी चालवलेले अव्याहत शोषण हेच आमच्या गरिबीचे मुळात कारण आहे, असा युक्तिवाद विकसनशील देशांनी केला. तेव्हा, वैश्विक पर्यावरणीय समस्यांच्या निराकरणासाठी प्रथम वैश्विक स्तरावरील आर्थिक सुधारणा घडवून आणण्याच्या मुद्यावर तिसऱ्या जगातील राष्ट्रांच्या गटाने एकमुखी जोर दिला. या स्टॉकहोम परिषदेची आणखी एक उपलब्धी म्हणजे संयुक्त राष्ट्रसंघाच्या पर्यावरण कार्यक्रमाची (युनायटेड नेशन्स् एन्व्हायर्न्मेन्ट प्रोग्रॅम - यूएनईपी) १९७३ साली झालेली औपचारिक स्थापना.

पर्यावरण रक्षण-संगोपनासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील वाढत्या सहकार्याच्या आवश्यकतेचा पुकारा स्टॉकहोम परिषदेने आवर्जून केला. परिणामी, पर्यावरणवाद्यांच्या गटातील संस्थात्मक विचारप्रणालीच्या समर्थकांचे हात अधिकच बळकट झाले. पर्यावरणीय समस्यांच्या निराकरणासाठी देशोदेशीच्या शासनसंस्थांवर कायदेविषयक नियंत्रणे बंधनकारक बनविण्यासंदर्भात नियमावली तयार करण्याची अनिवार्यता या गटाने हिरीरीने मांडली. तर, दुसरीकडे पर्यावरणाच्या संगोपनासाठी व्यक्तिगत पातळीवरील आचारसंहिता पाळण्यावर जैवतंत्रज्ञानवाद्यांचा रोख राहिला.पर्यावरणावर कुरघोडी करणारी आर्थिक प्रगती तसेच लोकसंख्या वाढ यांना लगाम घालण्यासाठी शासनसंस्थेने प्रवृत्त व्हावे, क्रियाशील बनावे ही भूमिका जैवपर्यावरणवाद्यांनी आग्रहपूर्वक प्रतिपादन केली.

खनिज तेल निर्यातदारांच्या जागतिक संघटनेने खनिज तेलाच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत तेलाच्या पुरवठ्याबाबत हात आखडता घेतल्याने उभ्या जगालाच भडकलेल्या तेलकिमतींमुळे जो 'ऑइल शॉक' बसला त्यामुळे एकंदरच जागतिक अर्थव्यवस्था १९७०च्या दशकात वावटळीत सापडली. साहजिकच पर्यावरणाच्या संगोपन-संवर्धनाचा मुद्दा अनेक देशांच्या सरकारांनी जवळपास बासनातच गुंडाळून टाकला. मात्र, त्याच वेळी, याच वास्तवाची एक प्रतिक्षिप्त क्रिया म्हणून की काय, पश्चिमेतर राष्ट्रांत अनेक ठिकाणी पर्यावरण रक्षणाचा झेंडा उभारणाऱ्या स्थानीय पातळीवरील बिगर सरकारी चळवळी निपजल्या-फोफावल्या. गरिबी, गरिबीची जन्मदात्री ठरणारी विषमता आणि या उभयतांची पर्यावरण संरक्षणाशी असलेली सांगड या चळवळींनी जोमदारपणे अधोरेखित केली. उपजीविकेच्या प्रश्नाची सोडवणूक आणि पर्यावरणाचे रक्षण-संगोपन यांच्यातील घनिष्ठ सांधा या चळवळींनी जागतिक समुदायासमोर ठसठशीतपणे मांडला.

यातूनच, पर्यावरण रक्षणासारख्या एका सामाजिक आंदोलनाचे तत्त्वज्ञानात्मक अधिष्ठान समाजासमोर आले. उत्तरकाशीच्या परिसरात सुंदरलाल बहुगुणा यांच्या प्रेरणेने प्रवर्तित झालेले 'चिपको' आंदोलन म्हणजे या बदलत्या प्रवाहाचे एक प्रातिनिधिक उदाहरणच.

## नवउदारमतवाद, खुले अर्थकारण आणि पर्यावरण संगोपन

खनिज तेलाच्या चटक्याने पोळलेल्या जगाला १९८०च्या दशकात सामोरे जावे लागले ते तिसऱ्या जगातील विकसनशील देशांसमोर उभ्या ठाकलेल्या परकीय कर्जांच्या अरिष्टापायी उद्‌भवलेल्या जागतिक अस्वस्थतेला. या अरिष्टानेही पर्यावरणीय रक्षणाच्या चळवळीला एक नवीनच आयाम पुरविला. आपल्या डोक्यावरील परकीय कर्जाचा बोजा फेडण्यासंदर्भातील आपली असमर्थता व्यक्त करीत कर्जाच्या परतफेडीस उघड नकार दर्शवित मेक्सिकोने १९८२ सालच्या ऑगस्ट महिन्यात या अरिष्टाला तोंड फोडले. मात्र, त्याच वेळी मुख्यतः ब्रिटन आणि अमेरिकेत वेगळेच आर्थिक वारे वाहत होते. ब्रिटनमध्ये तत्कालीन पंतप्रधान मार्गारेट थॅचर आणि अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष रोनाल्ड रेगन यांनी नवउदारमतवादी आर्थिक-वित्तीय धोरणांचा मोठ्या आक्रमकपणे अंगीकार -पुरस्कार सुरू केला.

खुल्या बाजारपेठेचा अंमल, मुक्त जागतिक व्यापार, भांडवल तसेच गुंतवणुकीचा विमुक्त संचार आणि हस्तांतरण आणि या सर्वांच्या माध्यमातून एकात्म अशा जागतिक अर्थव्यवस्थेचे प्रवर्तन ही सारी विचारप्रणाली सर्वत्र प्रसृत होऊ लागली. आर्थिक विकासासाठीच मुक्त अर्थकारण, हा या युक्तिवादाचा पाया होता. या नवीन मूल्यप्रणालीचा पर्यावरण संगोपनासंदर्भातील जागतिक विचारमंथनावर दूरगामी आणि तितकाच मूलगामी परिणाम झाला. तिसऱ्या जगातील विकसनशील देशांचे जागतिक अर्थव्यवस्था तसेच सत्तासोपानातील परंपरागत स्थान आणि त्यांचे आर्थिक मागासलेपण यांचा परस्परसंबंध तेथवर विकसित देशांना मान्य तरी होता. तिसऱ्या जगातील दारिद्र्य-मागासलेपणास पहिल्या जगातील विकसित देशांची धोरणे कारणभूत ठरत आहेत, ठरली आहेत हे सूत्र तेथवर स्वीकारार्ह तरी होते. मात्र, जागतिक अर्थव्यवस्थेशी आपली नाळ जोडून घेण्यात विकसनशील देशांना त्यांच्या बंदिस्त धोरणांपायीच अडथळा निर्माण होत असल्याने त्या देशांची आर्थिक आणि पर्यायाने पर्यावरणीय दुरवस्था हटत नाही, असा विचारव्यूह नवउदारमतवादी अर्थकारणाची सद्दी सुरू झाल्यानंतर मूळ धरू लागला. यात झाले इतकेच की, पर्यावरणाच्या रक्षण-संगोपनासंदर्भातील बाजारपेठीय -उदारमतवादी गटाची सरशी झाली !

(कृपया पृष्ठ ३३ पहावे)

# विचार आणि व्यवहार

'सातत्यशील विकासा'ची संकल्पना तात्त्विक आणि वैचारिक पातळीवर कितीही उचित आणि गोमटी दिसत असली तरी प्रत्यक्ष व्यवहारात तिचा अवलंब करीत असताना मात्र विलक्षण तारांबळ उडत असल्याचा प्रत्यय आजवर जागोजागी आलेला आहे. विशेषत:, विकासाचा अतिशय मोठा 'बॅकलॉग' भरून काढण्याचे आव्हान ज्या विकसनशील देशांपुढे आजमितीस प्रकर्षाने उभे आहे, अशा देशांची अवस्था तर 'धरले तर चावते आणि सोडले तर पळते' अशी अगतिक झाल्याचेच दिसते. त्यातही पुन्हा, आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत नाना प्रकारचे अंतर्विरोध निर्माण झालेल्या, विविध प्रकारच्या असंतुलनांनी ठयीठायी ठाण मांडलेल्या आणि त्यातच (स्वखुषीने अथवा नाईलाजाने) उदारीकरणाचा पर्याय स्वीकारलेल्या भारतासारख्या देशात तर हे वास्तव अधिकच ठसठशीतपणे सामोरे येते. कारण, मुळातच भारतीय अर्थव्यवस्थेत पूर्वापार पोसल्या गेलेल्या नानाविध विषमतांची धार उदारीकरणप्रधान आर्थिक प्रगतीच्या 'मॉडेल'चा अंगीकार केल्यानंतर तर अधिकच गहिरी झाल्याचे गेल्या सुमारे दीड दशकादरम्यान वारंवार सिद्ध झाले आहे.

खासगीकरण -उदारीकरणाच्या मंत्राचा लाभ झालेल्या समाजगटांच्या क्रयशक्तीमध्ये आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या अंमलबजावणीनंतर घसघशीत वाढ घडून आली. परिणामी, त्यांच्या वाढीव उपभोगाचा, विस्तारलेल्या मागणीचा उपशम करण्याच्या गरजेतून मुळातच मर्यादित असलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीच्या वापरावर अधिकच ताण निर्माण झाला. तर, दुसरीकडे आवश्यक त्या क्रयशक्तीच्या अभावापायी, या लाभांच्या परिघाबाहेरच ढकलल्या गेलेल्या सामाजिक समूहांच्या किमान गरजांची पूर्तता करण्याचे आव्हान दिवसेंदिवस बिकट होत जाताना दिसते आहे. या जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी का होईना, परत, वाढीव उत्पादन, वाढीव पुरवठा, नैसर्गिक साधनसामग्रीचा वाढता वापर या चक्राकार पर्यायाचा अवलंब करण्यावाचून अन्य पर्यायच राहिलेला दिसत नाही. सर्वसाधारण आर्थिक विकासाचा दर याचदरम्यान चांगल्यापैकी वाढलेला असल्याने नागरिकीकरणाची प्रक्रियाही अधिक जोमदार बनण्याबरोबरच तिच्या जडणघडणीतही महत्त्वाचे असे गुणात्मक बदल घडून येत

आहेत. या सगळ्या घटितांचा पर्यावरणावर होणारा परिणाम हा बहुआयामी आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर, सातत्यशील पर्यावरणाचा विचार आणि त्याच्याशी सुसंगत असा व्यवहार यांच्यातील तोल सांभाळणे ही खरोखरच तारेवरची कसरत ठरत आहे. देशाच्या ग्रामीण तसेच शहरी विभागांतील पर्यावरणाचे प्रचलित भयाण वास्तव पाहता, सातत्यशील, पर्यावरणाशी सुसंवादी अशा आर्थिक विकासाचे तत्त्वज्ञान आणि त्या तत्त्वज्ञानाशी सुसंगत असा आचार यांच्यातील तोल सांभाळणे हे किती जटिल आहे, याची प्रचिती अनेक बाबींसंदर्भात येते.

लोकसंख्येचा विचार करता, आजमितीस, देशाच्या एकंदर लोकसंख्येपैकी सुमारे ७२ टक्के लोकसंख्या ही ग्रामीण विभागांत सामावलेली आहे. देशातील मुख्य श्रमिकांचा विचार केला तर, उपजीविकेसाठी शेती अथवा शेतीसंलग्न व्यवसायोद्योगांवर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण आजही जवळपास ५१-५२ टक्के इतके मोठे आहे. ही पुन्हा झाली देशपातळीवरील सरासरी. राज्याराज्यांत तर खूपच तफावत अनुभवास येते. अशा परिस्थितीत, शेतीचा आणि एकंदरच ग्रामीण जीवनाचा कणा असलेल्या जमीन आणि पाणी या दोन मुख्य नैसर्गिक संपदेची आजची अवस्था बघितली तर ती केवळ दयनीयच आहे. वाढत्या लोकसंख्येच्या आणि त्याच वेळी ज्यांच्या हाती नव्यानेच क्रयशक्ती निर्माण होत आहे अशा समाजसमूहांच्या उदरभरणाची वाढती गरज पुरविण्यासाठी अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्याखेरीज आज गत्यंतरच नाही. परंतु, १९६०च्या दशकात देशात साकारलेल्या हरित क्रांतीनंतर एकंदरच शेतीमध्ये रासायनिक खतांच्या वापरात जी लक्षणीय वाढ घडून आली त्या वाढीचे दुष्परिणाम आता अनुभवास येऊ लागले आहेत.

रासायनिक खतांची वाढती मात्रा आणि ती मात्रा जमिनीच्या पचनी पडावी यासाठी पाण्याचा मुबलक वापर यांपायी जमिनीतील क्षारांचे प्रमाण वाढून नापिकी होण्याचा धोका आजमितीस पंजाबसारख्या समृद्ध राज्यालाही आज भेडसावतो आहे. रासायनिक खते आणि पाणी यांचे वाढते डोस दिल्याने जमिनींची उत्पादकता घटते आहे. याचा थेट परिणाम अन्नधान्याच्या उत्पादनमात्रेवर होतो आहे. परिणामी, धान्यजिनसांच्या बाजारपेठीय किमतींवर ताण येतो आहे. उत्पादन वाढवायचे तर, दर एकरी उत्पादकता वाढविण्यावाचून गत्यंतर नाही. थोडक्या काळात उत्पादकता वाढवावयाची असेल तर रासायनिक खतांचा विनियोग करण्यावाचून पर्याय नाही. मग, रासायनिक खते व पाणी यांचा वाढता वापर, त्यापायी जमिनीतील क्षारांचे वाढते

प्रमाण, परिणामी जमिनीची घटती उत्पादकता, त्यामुळे घटणारा उत्पादन वाढीचा वेग, त्याचे अन्नधान्याच्या बाजारभावांमध्ये पडणारे प्रतिबिंब... हे सारे चक्र भेदायचे कसे ? जमीन आणि पाणी यांच्या अतिरिक्त वापरापायी या नैसर्गिक साधनसंपत्तीची दीर्घकालिक हानी होते ती वेगळीच.

अन्नधान्योत्पादनात वाढ घडवून आणण्याचे पर्याय दोन. एकतर, लागवडीखालील क्षेत्राची उत्पादकता उंचावणे आणि/किंवा नवनवीन क्षेत्र लागवडीखाली आणणे. यापैकी पहिला पर्याय अवलंबला तर रासायनिक खते आणि पाणी यांच्या वाढीव मात्रांचे पर्यावरणावर अनिष्ट परिणाम होतात. दुसरा पर्याय अवलंबला तरी त्यामुळे पर्यावरणावर आच येतच नाही, असेही नाही. कारण, मुळात विस्तारणारे नागरीकरण, उद्योगांचा वाढता व्याप, धरणे, रस्ते, वीजप्रकल्प, घरबांधणी यांसारख्या बाबींसाठी जमिनीचा वापर अलीकडच्या काळात वाढत असल्याने शेतीखालील क्षेत्रातच घट होऊ पाहत आहे. अशा परिस्थितीत, लागवडीखाली वाढीव क्षेत्र आणून अन्नधान्याचा पुरवठा वाढविण्यासाठी उपलब्ध असणारा मार्ग म्हणजे जंगलांखालील जमिनींचे रूपांतर शेतीमध्ये करणे. आता, वाढत्या शहरीकरणाबरोबर घरबांधणीच्या वाढत्या मागणीची परिपूर्ती करण्यासाठी बांधकामयोग्य लाकडाचा वापर वाढत असल्याने अगोदरच जंगलांवर वेगाने कुऱ्हाड चालविली जात आहे. त्यातच पुन्हा, शेतीसाठी जंगलतोड हाती घ्यावयाची म्हटले तर जंगलसंपत्तीसारख्या मौल्यवान नैसर्गिक साधनसंपत्तीवर आच येणारच. मग सातत्यशील विकासाची तर बातच सोडा !

शेतीची उत्पादकता वाढवत असतानाच शेतीवर उपजीविकेसाठी अवलंबून असणाऱ्यांच्या संख्येत घट घडवून आणण्याने ग्रामीण भागांतील गरिबीचा आणि त्यापायी ग्रामीण पर्यावरणावर येणाऱ्या ताणाचा मुकाबला शक्यतेच्या कक्षेत येतो. त्या दृष्टीने ग्रामीण परिसरातील बिगर शेती उद्योगव्यवसायांचा वाढविस्तार घडवून आणणे अगत्याचे ठरते. मात्र, इथे प्रश्न उभा ठाकतो तो ऊर्जेच्या पुरवठ्याचा. देशात मुळात ऊर्जेचाच तुटवडा असल्याने भारनियमनाची पहिली कुऱ्हाड चालते ती ग्रामीण परिसरावर. अशा परिस्थितीत, उद्योगधंद्यांचे विकेंद्रीकरण कसे व्हावे ? दुसरे म्हणजे, जमिनीच्या कसावरच तोललेली ग्रामीण भारताची अर्थव्यवस्था गांजलेली असल्याने स्थानिक परिसरातील बाजारपेठीय मागणी कमकुवत राहते. त्यामुळे, खेडोपाडी व्यवसाय थाटण्याच्या उद्योगांच्या ऊर्मीही मग कोळपतात. त्यातच, सार्वजनिक अर्थव्यवस्थेच्या अंगभूत शबलतांपायी पायाभूत सेवासुविधांच्या ग्रामीण भागातील विकासविस्तारावर

मर्यादा आल्याने उद्योगधंद्यांनी आपल्या गुंतवणुकीचे तोंड शहरांकडेच वळवावे, यातही अनैसर्गिक असे काहीच ठरत नाही. आधुनिक तंत्रज्ञान, गुंतवणूक, औद्योगिक रोजगार संधी यांचे मोठ्या शहरांमधील केंद्रीकरण यातूनच फोफावते.

ग्रामीण भागांकडून मोठ्या शहरांकडे स्थलांतर करण्याचा पर्याय यामुळे स्वाभाविकपणेच अंगिकारला जातो. यातून शहरी पर्यावरणाचा प्रश्न दिवसेंदिवस उग्र बनतो आहे. विशेषतः, भारतातील नागरी विकासविस्तारातील असंतुलनामुळे मोठ्या शहरांच्या पर्यावरणाचा प्रश्न अधिकच संवेदनशील आणि जटिल बनला आहे. मोठ्या शहरांमध्ये लोकसंख्येचे होणारे वाढते केंद्रीकरण, त्यापायी शहरांमधील निवासी जागेसहित सर्वच मर्यादित साधनसामग्रीवर येणारा ताण यांमुळे एकंदरच शहरी पर्यावरणाची दुर्दशा होत आहे. नागरी प्रदूषण हा आजच्या आघाडीच्या नागरी समस्यांमधील अग्रमानांकित घटक आहे. शुद्ध अशा पिण्याच्या पाण्याचा अभाव, वाहनांच्या अफाट गजबजाटापायी धुरांनी प्रदूषित झालेले शहरी वातावरण, निवासी जागेच्या भयानक तुटवड्यापायी मोठ्या शहरांमध्ये एकवटणाऱ्या झोपडपट्ट्या, लोकसंख्येच्या वाढत्या केंद्रीकरणाबरोबर दिवसेंदिवस गंभीर होत असलेला कचरा संकलन आणि निर्मूलनाचा प्रश्न, अप्रतिहत स्थलांतरणापायी शहरांमध्ये फोफावणारे शहरी असंघटित रोजगार क्षेत्र, त्यातून निपजणारे आणि उत्तरोत्तर सघन होत जाणारे शहरी दारिद्र्य, वाढत्या अभावग्रस्ततेपायी शहरी पर्यावरणावर पुन्हा वाढणारा ताण... या साऱ्या दुष्टचक्रात आजचे भारतीय शहरी ज़ीवन करचळून गेलेले आहे.

एका अर्थाने हे सारे प्रश्न विकासाशी निगडीतच आहेत. आर्थिक पुनर्रचनेच्या तत्वज्ञानात सरकार आणि खासगी क्षेत्र यांच्या परस्पर जबाबदाऱ्यांची जी फेररचना अध्याहृत आहे, त्याच्याशी पर्यावरण रक्षणाच्या साऱ्या लढाईचा सांधा जुळलेला आहे. विशेषतः, शहरी पर्यावरण संगोपनाच्यासंदर्भात विशेष कळीची ठरते ती नगरपालिका व महानगरपालिकांसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका, कार्यक्षमता आणि त्यांच्या ठायीच्या अंगभूत क्षमता. मुळात, शहरी पर्यावरणाचे संगोपन -संवर्धन हा ज्या व्यापक अशा नागरी व्यवस्थापनाचा घटक आहे, ते नागरी व्यवस्थापनच कार्यक्षमतेने करण्याची स्थानिक स्वराज्य संस्थांची क्षमता वाढविण्याचा हा प्रश्न आहे. दुसऱ्या अंगाने बघितले तर, पर्यावरण रक्षणासंदर्भातील बाजारपेठीय-उदारमतवादी व संस्थात्मक गट एकीकडे आणि जैवपर्यावरणवादी गट दुसरीकडे यांच्या भूमिकांमधील द्वंद्वाचाच हा स्थानीय पातळीवरील आविष्कार ठरतो !

(पृष्ठ २८ वरून)

एकीकडे तिसऱ्या जगातील देशांना भेडसावणारे परकीय कर्जांच्या बोजाचे संकट आणि दुसरीकडे उदारीकरणप्रधान अर्थकारणविषयक विचारांचा गेली दोन दशके अबाधित असलेला प्रभाव या उभय घटकांनी पर्यावरण आणि आर्थिक विकासासंदर्भातील जागतिक आयोगाच्या स्थापनेची पायाभरणी केली. संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेने प्रवर्तित केलेल्या 'वर्ल्ड कमिशन ऑन एनव्हायर्न्मेन्ट ॲन्ड डेव्हलपमेन्ट'ची स्थापना १९८४ साली झाली. पर्यावरण आणि जागतिक आर्थिक विकास यांच्यातील परस्पर आंतरसंबंधांचा अभ्यास करणे, हे या आयोगाचे मुख्य उद्दिष्ट होते. नॉर्वेच्या पंतप्रधान Gro Harlem Brundtland यांच्याकडे या आयोगाच्या अध्यक्षपदाची धुरा असल्याने Brundtland Commission असेच त्याचे नामकरण केले गेले. Our Common Future या शीर्षकाचा आयोगाने तयार केलेला अहवाल १९८७साली प्रकाशित झाला. आर्थिक विकासाची पर्यावरण केंद्री व्याख्या या अहवालाने पूर्णतः नव्याने केली, हे त्याचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य.

पर्यावरणाच्या संगोपन -संवर्धनाबाबतच्या चर्चेस एक नवीनच परिमाण या अहवालाने बहाल केले. पर्यावरणाच्या संगोपनासंदर्भात विकसित देश तसेच विकसनशील देशांच्या ज्या आपापल्या गटनिष्ठ भूमिका होत्या त्यांतून एक मध्यम मार्ग शोधण्याचा अहवालाने प्रयत्न केला. पर्यावरणरक्षणाबाबत एकीकडे बाजारपेठीय -उदारमतवादी आणि संस्थात्मक गटांची असणारी विचारप्रणाली तर, दुसरीकडे जैवपर्यावरणवादी आणि 'सोशल ग्रीन्स' या उभय गटांची असणारी मतप्रणाली यांचा अगदी समन्वय जरी नाही तरी परस्परांशी सुसंवादी मार्गांचा उच्चार वा निर्देश या अहवालात करण्यात आला. निदान अशा प्रयत्नांची दिशा तरी शोधण्याचा प्रयत्न केला गेला. विविध गटोपगटांच्या पचनी पडेल असा पर्यावरण रक्षण -संगोपनाचा पर्याय शोधण्यावर या संपूर्ण अहवालाचा भर राहिला.

औद्योगिक प्रगती, औद्योगिक प्रगतिप्रधान आर्थिक विकास आणि औद्योगीकरण या बाबी पर्यावरणावर घाला घालणाऱ्या अशाच आहेत, आर्थिक विकासाच्या या 'मॉडेल'चा अंगीकार केल्याने पर्यावरणाची हानीच होते, या अवघ्या बाबी पर्यावरण तसेच नैसर्गिक साधनसामग्रीच्या शत्रूच आहेत, अशी टोकाची भूमिका घेण्याचे अहवालाने टाळले. तर, त्याच वेळी, जोमदार औद्योगीकरणाइतकेच दारिद्र्य हेही पर्यावरणाच्या ऱ्हासास कारणभूत ठरते, या तिसऱ्या जगातील विकसनशील राष्ट्रांनी स्टॉकहोम

परिषदेदरम्यान मुखर केलेल्या भावनेचाही आदर करीत अहवालाने तिची दखल घेतली. विकसनशील देशांमध्ये अनुभवास येणारी गरिबी हा जागतिक अर्थकारणाच्या विद्यमान जडणघडणीचा परिपाक आहे, ही भूमिकाही अहवालाने मान्य केली.

साहजिकच, १९६० तसेच १९७०च्या दशकांत जो आर्थिक विकास घडून आला आणि तो ज्या मार्गांनी व साधनांनी साकारला तो वांछनीय नाही, या विचारप्रणालीवर अहवालाने शिक्कामोर्तब केले. आगामी काळात घडून येणारा जागतिक अर्थव्यवस्थेचा विकास हा पर्यावरणाशी सुसंवादी अशा प्रकारचा असला पाहिजे, असे स्वच्छ प्रतिपादन या अहवालात करण्यात आले. पर्यावरण रक्षण -संगोपनासंदर्भातील चर्चा-विचारमंथनात आज ठायीठायी वापरली जाणारी 'सातत्यशील विकास' (सस्टेनेबल डेव्हलपमेन्ट) ही संज्ञा -संकल्पना प्रथम योजली गेली ती याच अहवालात. ही संज्ञा -संकल्पना म्हणजे, 'Our Common Future' नामक अहवालाने पर्यावरण संगोपनविषयक परिभाषेला बहाल केलेली जणू चिरस्थायी देणगीच म्हणावयास हवी ! 'आगामी काळातील पिढ्यांच्या गरजांवर (आणि त्या गरजा पूर्ण करण्यासाठी उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीवर) कुरघोडी न करता विद्यमान पिढ्यांच्या गरजांची पूर्तता करणारी' आर्थिक विकासाची प्रक्रिया म्हणजे 'सातत्यशील विकास'.

पर्यावरण रक्षणासंदर्भातील जागतिक विचारविनिमय पुढील मोठ्या टप्प्यावर पोहोचला तो ब्राझीलमधील रिओ द जानेरिओ येथे २००२ साली भरलेल्या 'वसुंधरा परिषदे'च्या रूपाने. 'सातत्यशील विकास' या संकल्पनेचीच पूर्ण या परिषदेवर छाया होती. सातत्यशील विकासाच्या तामिलीसंदर्भात विकसित देशांचा गट आणि विकसनशील देशांचा गट या उभय गटांत असलेल्या विसंवादाचे पडसाद वसुंधरा परिषदेदरम्यान स्पष्टपणे अनुभवास आले. पर्यावरण रक्षणासंदर्भात विकसनशील देशांनी वाढीव बांधिलकी दर्शवावी, अशी विकसित देशांच्या गटाची अपेक्षा या परिषदेच्या व्यासपीठावर व्यक्त झाली. तर, पर्यावरणाशी सुसंवादी ठरेल अशी 'हरित प्रगती' साध्य करण्यासाठी मोजाव्या लागणाऱ्या वाढीव किमतीचा बव्हंश बोजा विकसित राष्ट्रांनीच उचलावा, अशी विकसनशील राष्ट्रांची भूमिका होती. तसेच, पर्यावरण संगोपनाच्या मुद्द्याची ढाल करून विकसित देश जागतिक बाजारपेठेत आपली व्यापारी कोंडी करतील, या संशयाने विकसनशील देशांच्या मनात घर केले होते.

संशयाचे हेच ढग अधिक गडद झाल्याचे वास्तव जागतिक व्यापार संघटनेच्या निर्मितीनंतर उभ्या जगानेच अनुभवले ! ✿✿

# आम्लयुक्त समुद्रांकडे ?

पृथ्वीचे वाढते तापमान आणि पर्यावरणाचा होत असलेला विनाश हे काळजीचे आणि अभ्यास-संशोधनाचे विषय ठरले आहेत. या विषयांबरोबरच इतर संबंधित मुद्यांचाही बराच ऊहापोह करण्यात येत आहे. पृथ्वीच्या वाढत्या तापमानासाठी कारणीभूत असलेला कार्बन डायॉक्साइड हा वायू समुद्रांतील पाणी शोषून घेते, ही एक दिलासा देणारी बाब या अभ्यासादरम्यान पुढे आली होती. मात्र समुद्रांतील पाण्याची आम्लता वाढत असल्याचेही त्याच वेळी स्पष्ट झाले होते. कार्बन डायॉक्साइड शोषून घेण्याच्या प्रक्रियेमुळेच ही आम्लता वाढत असल्याचे मत संशोधकांनी मांडले आहे.

विविध कारणांमुळे वातावरणातील कार्बन डायॉक्साइडचे प्रमाण वाढत असते. संशोधकांचा असा अंदाज आहे की खनिज इंधनाच्या वापरामुळे निर्माण होणाऱ्या कार्बन डायॉक्साइडपैकी सुमारे एक-तृतीयांश वायू समुद्रांकडून शोषला जातो. या प्रक्रियेमुळे पृथ्वीचे वाढते तापमान कमी होण्यास मदत झाल्याचे आढळते. मात्र त्याच वेळी सागरी जीवनावर याचे विपरित परिणाम होत आहेत, असे अलीकडच्या अभ्यासांमधून स्पष्ट होत आहे. वातावरणातील कार्बन डायॉक्साइड जेव्हा समुद्राच्या पाण्यात विरघळतो तेव्हा रासायनिक क्रिया होऊन कार्बोनिक आम्ल तयार होते, तर समुद्रातील पाणी हे क्षारयुक्त असते. पण गेल्या काही वर्षांत समुद्रातील पाण्याची आम्लता वाढते आहे आणि क्षारतेचे प्रमाण मात्र कमी होते आहे. पाण्याची आम्लता वाढण्याचे परिणाम समुद्री जीवनावर कसकसे होऊ शकतात, हा संशोधकांसाठी वादाचा विषय बनला होता. 'अमेरिकन असोसिएशन फॉर ॲडव्हान्समेन्ट ऑफ सायन्स'च्या बॉस्टन येथे अलीकडे झालेल्या परिषदेत यावर ऊहापोह करण्यात आला.

समुद्रात अपृष्ठवंशीय (invertibrate) प्राण्यांच्या अनेक प्रजाती आढळतात. त्यांना कॅल्शियम कार्बोनेटचे कठीण कवच (shell) असते. हे कठीण कवच म्हणजे या प्रजातींचे सुरक्षित असे घरच असते. कालांतराने या बाह्य आवरणापासून चुनखंडे आणि खडू तयार होत असतो. खडू आणि आम्ल यांच्यात रासायनिक क्रिया घडून येते तेव्हा खडू पूर्णपणे विरघळतो. म्हणजे समुद्रातील पाण्याची आम्लता वाढते तेव्हा

एकप्रकारे या प्राण्यांचे हे घरच नष्ट होण्याच्या शक्यता वाढतात. साहजिकच या अपृष्ठवंशीय प्राण्यांचे अस्तित्वच धोक्यात येते. यामुळे समुद्रातील जैववैविध्य संपुष्टात येऊ शकेल, असे मत मांडण्यात आले आहे.

नष्ट झालेल्या प्राण्यांच्या अवशेषांची माहिती अभ्यासल्यानंतर संशोधकांनी स्पष्ट केले आहे की लक्षावधी वर्षांपूर्वी पृथ्वीवरील अनेक प्रजाती नष्ट झाल्या. ही प्रक्रिया फार मोठ्या प्रमाणावर घडून आली. असे होण्यामागे एक महत्त्वाचे कारण म्हणजे ज्वालामुखींचे स्फोट हे असून त्या वेळी वातावरणातील कार्बन डायॉक्साइडचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले होते. नष्ट झालेल्या प्रजातींपैकी काही प्रजातींवर याचा परिणाम अधिक प्रमाणात झाला. प्रत्येक प्रजातींचा वेगळा अभ्यास करण्याऐवजी संशोधकांनी साधर्म्य असणाऱ्या प्रजातींचा एक गट करून त्यानुसार अभ्यास केला. त्या वेळी असे दिसून आले की sponges, corals, brachiopods यांतील ९० टक्के प्रजाती नष्ट झाल्या. तर molluscs, anthropods यांतील निम्म्याच प्रजाती नष्ट झाल्या. असे घडले कारण ज्या घटकांपासून molluscs, anthropods आपले कठीण कवच तयार करत होते त्या घटकांमधील रासायनिक क्रियांमध्ये एक समतोल राखणे त्यांना शक्य झाले. म्हणजे त्या घटकांमधील आम्लता वाढू न देणे त्यांना जमले. ज्या प्रजाती नष्ट झाल्या त्यांना हा समतोल साधता न आल्याने आम्लतेचे प्रमाण वाढले. त्यामुळे काळाच्या ओघात त्या नष्ट झाल्या.

अर्थात, आजची परिस्थिती एवढी हाताबाहेर गेलेली नाही. समुद्रातील पाण्याची आम्लता वाढण्याचे प्रमाण आहे असेच राहिले तर २१०० साली समुद्राच्या पाण्यातील क्षारतेचे प्रमाण बरेच घटेल, असा अंदाज आहे. त्यामुळे पृथ्वीच्या दक्षिण भागांतील समुद्र प्रवाळांसाठी अयोग्य ठरतील. या विषयीच्या संशोधनांतून असे दिसून आले की कार्बन डायॉक्साइडचे प्रमाण वाढतच राहिले तर हाडांचा सापळा तयार करण्यासाठी काही प्राण्यांच्या जनुकांना आपल्या क्षमतेच्या तिप्पट जास्त कार्य करावे लागते. असे झाल्यानंतरही जे सापळे तयार होतात त्यांत अनेक दोष/उणीवा राहतात. म्हणजे वातावरणातील कार्बन डायॉक्साइडमुळे समुद्रातील जीवसृष्टीलाच धोका निर्माण होऊ शकतो. म्हणजे याचा अर्थ असा की समुद्रातील पाणी वातावरणातील कार्बन डायॉक्साइड शोषून घेत असले तरी त्यामुळे निश्चिंत राहणे परवडणारे नाही. म्हणून पर्यावरणाचा समतोल साधून जैववैविध्य कायम राखण्यासाठी वातावरणातील कार्बन डायॉक्साइडचे प्रमाण घटविणे हेच अंतिमतः गरजेचे आहे!

## प्रमुख संदर्भ

**(A) Books-** (1) Forgotten Families: Ending the Growing Crisis Confronting Children and Working Parents in the Global Economy, Jody Heymann, Oxford University Press, USA - 2006 (2) Paths to a Green World - The Political Economy of the Global Environment, Jennifer Clapp and Peter Dauvergne, (a) Chapter 3 : The Globalisation of Environmentalism, pp. 45-82 (b) Chapter 8: Paths to a Green World ? Four Visions for a Healthy Global World, pp. 221-244, Academic Foundation, New Delhi, 2008, (3) Urban Environment - India Infrastructure Report 2006, Urban Infrastructure, 3iNetwork, Oxford University Press, New Delhi, 2006, pp. - 208-231 (4) Rural Environment - India Infrastructure Report 2007, Rural Infrastructure, 3iNetwork, Oxford University Press, New Delhi, 2007, pp. - 226-246 **(B) Magazines** - (1)The Economist - 23 February 2008, p.- 85 ■■

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे नवे प्रकाशन

**आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणाऱ्या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ**

# कर्ता-करविता

## आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन

**मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**

●मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

पृष्ठे २४२ किंमत ३५०/-रुपये

**ग्रंथ घेणाऱ्यांना अर्थबोधपत्रिका मासिक एक वर्ष विनामूल्य**

## अर्थबोधपत्रिका वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**(१ जून २००६ पासून)**

**वार्षिक वर्गणी** फक्त १०० / - रुपये

**द्वैवार्षिक वर्गणी** फक्त १८० / - रुपये व 'अर्थबोधपत्रिके'चा मेंदूसंशोधन विशेषांक भेट

**त्रैवार्षिक वर्गणी** फक्त २६० / - रुपये व एक पुस्तिका भेट

**पंचवार्षिक वर्गणी** फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी) (४) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये) (५) मेंदूसंशोधन विशेषांक ( किंमत ४०/-रुपये)

## ग्रंथालयातील नवी पुस्तके

**■ (१) स्त्रीविकासाच्या पाऊलखुणा : (१८५० ते १९५०मधील स्त्रियांच्या निवडक लेखांचा संग्रह), (२) स्त्रीविकासाचे नवे क्षितीज (१९५१ ते २००७मधील स्त्रियांच्या वैचारिक लेखांचा संग्रह), उभय पुस्तकांच्या संपादक डॉ. स्वाती कर्वे व प्रकाशक प्रतिमा प्रकाशन, पुणे. पहिल्या पुस्तकाचे प्रकाशन वर्ष - ऑगस्ट २००३ (प्रथम आवृत्ती),पृष्ठे - ५१२, मूल्य - रुपये - ३५०/-. दुसऱ्या पुस्तकाचे प्रकाशन वर्ष २००८, पृष्ठे ८७२ व रंगीत छायाचित्रांची आठ पाने अधिक, मूल्य -रुपये - ९००/-.**

स्त्रीविषयक प्रश्नांबाबतच्या मराठीमधील लेखनाचे दालन आजमितीस खूपच समृद्ध असल्याचे चित्र दिसते. ललित, वैचारिक, संशोधकीय, चरित्र - आत्मचरित्रपर, मुलाखती, आठवणी अशा नानाविध धाटांचा त्यांत अंतर्भाव आहे. स्त्रीप्रश्नांच्या अध्ययन-अध्यापन-संशोधनाबाबत 'ॲकॅडमिक' वर्तुळातही बरेच उपक्रम ठिकठिकाणी प्रवर्तित झाल्याचे अनुभवास येते. विद्यापीठांमधून कार्यरत असलेली स्त्री अभ्यास केंद्रे या वास्तवाची साक्ष पुरवितात. या साऱ्या धडपडीतूनच विविध काळांतील स्त्रीजीवनाचे कवडसे समोर मांडणाऱ्या दर्जेदार अभ्यास तसेच संशोधन साहित्याची विपुल निर्मिती झाली आहे, आजही होत आहे. डॉ. स्वाती कर्वे यांनी सिद्ध केलेल्या उपरोक्त दोन्ही ग्रंथांमुळे या साहित्यसंभारात मौलिक भर पडलेली आहे. 'स्त्रियांच्या लेखनातून जिवंत होणारा त्यांच्या विकासाचा प्रवास प्रातिनिधिक स्वरूपात एकत्रित करावा असे मनापासून वाटल्याने सदर संपादित पुस्तकाच्या कामाकडे मी वळले' या डॉ. कर्वे यांच्या निवेदनातूनच प्रस्तुत ग्रंथांचे वैशिष्ट्य आणि संदर्भसाधन म्हणून असणारे त्यांचे वेगळेपण स्पष्ट होते. त्या त्या काळातील लेखिकांच्या विचारमंथनाचे केलेले हे संकलन म्हणजे स्त्रिया 'लेखक' बनण्याच्या दीड शतकांच्या प्रक्रिया-प्रगती-प्रवासाचा हा आलेखच आहे. थेट १९ व्या शतकापासूनच्या लेखनाचा अंतर्भाव या ग्रंथप्रकल्पात करण्यात आलेला असल्याने, स्त्रियांच्या भावनिक तसेच वैचारिक विश्वातील स्थित्यंतरांप्रमाणेच या संपूर्ण कालावधीदरम्यान मराठी भाषेच्या जडणघडणीत साकारलेल्या स्थित्यंतराचेही दर्शन इथे घडते. हे ग्रंथ म्हणजे महाराष्ट्रातील स्त्रीविश्वात घडून आलेल्या परिवर्तनाबरोबरच सामाजिक परिवर्तनाचेही तपशील उलगडणारे दस्तऐवज आहेत. ■■

RNI Regn.No. MAHMAR/2002/9806
Postal Regn.No.: L-2/RNP/PNW/M 125/2007-2009
Licensed to Post Without Prepayment, LICENCE NO. LWP-228
Posted at Market Yard P.S.O. on 10th of each month

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते.

■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

•अजित कर्णिक •विकास चित्रे •अभय टिळक •कुमुदिनी दांडेकर
•ललित देशपांडे •द.ना. धनागरे •आनंद नाडकर्णी
•सुहास पळशीकर •रमेश पानसे •मनोहर भिडे •योगेंद्र यादव •नीळकंठ रथ
•व्ही.एम्.राव •ए.वैद्यनाथन •रामदास होनावर

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**